
આશય ૨૦૩૮.



मार्गदर्शन :

१९९५ पासून मराठी प्रबोधन आशय हस्तलिखित प्रकाशित करीत आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः संशोधन करून - संदर्भ शोधून एखाद्या विषयावर काम करावे आणि त्यातून लेखनाचा - संपादनाचा अनुभव घ्यावा अशी या मागची कल्पना आहे. 'आशय'च्या संपादनातून आजच्या उत्तम पत्रकारांची जडणघडण झाली आहे. महाविद्यालयीन जीवनात एखाद्या विषयाला वाहिलेल्या अंकाची निर्मिती करता येणे ही फार मोठी गोष्ट आहे. मराठी विभाग सातत्याने आशय प्रकाशित करीत आहे. त्यात खंड पडू नये हा प्रयत्न राहिलेला आहे.

आज लेखन - संपादनासाठी परिश्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होते आहे पण तरी अशा प्रकारची जाण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे, ती टिकवणे - विकसित करणे हे घडायलाच हवे आहे. त्या प्रयत्नातूनच यंदाचा 'आशय' साकार झाला आहे. त्याकरता विद्यार्थ्यांच्या टीमचे अभिनंदन! आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!

— डॉ वीणा सानेकर

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 'आशय' चे कर्ते

संपादन :

| | |
|---|---|
| नितेश शिंदे | तृ. व. कला |
| वर्षा चांदणे | द्वि. व. कला |
| गौरी पातडे | द्वि. व. कला |
| रोहन भंडारे | तृ. व. कला |
| सनी चिंधे | तृ. व. कला |
| स्वप्नील कुरे | तृ. व. कला |
| दीपाली गायकवाड | तृ. व. कला |
| संदेश जाधव | तृ. व. कला |

FOR EDUCATIONAL USE


FOUNTAIN
निवडक पु.ल.
भाग २
• मी आणि माझा शत्रुपक्ष • सखाराम गटणे

# पु.ल. दर्शन

## अनुक्रमणिका


1) पु.ल. परिचय

2) ग्रंथसंपदा

3) पु.लं.चे चित्रपटसृष्टीतील योगदान

4) व्यक्ती आणि वल्ली

5) मला घडवणारे शिक्षक


## पुलंचे निवडक लेख


6) रॉंग नंबर - 1)

2)

3) घरगुती भांडण

4) फसवणूक / हसवणूक.

7) बिगरी ते मॅट्रिक एक भारी बिकट वाट


Sundaram FOR EDUCATIONAL USE

8] माशी

9] साल वारांची कहाणी

10] माझे पौष्टिक जीवन कडकट्ट .... कळकट

## पु. ल. देशपांडे बंगाल व शांतिनिकेतन.

## पुलचे निवडक नाट्यवाङ्मय.

11] "तुका म्हणे आता"

12] बटाट्याची चाळ.

## पुलांची निवडक भाषणे.

13] अभ्यास एक छंद.

14] पु. ल. भावाजली

15] पुलंना पत्र ...

## संदर्भसूची.

undaram®

FOR EDUCATIONAL USE

मराठी वाङ्मय कोश संपादक
१९२० पासून २००३

देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण (८ नोव्हेंबर १९१९ ते १२ जून २०००) वडील लक्ष्मणराव देशपांडे नाटक-संगीत प्रेम आणि आजोबा वामन दुभाषी - ऋग्वेदी नावाजलेले लेखक अशा वातावरणात पु.ल.चे बालपण गेले. टिळक विद्यालय विलेपार्ले इस्माइल युसूफ महाविद्यालय मुंबई फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथे त्यांनी शिक्षण घेतले. १९५० मध्ये विलिंग्डन कॉलेज मधून एम.ए झाल्यावर बेळगावातल्या राणी पार्वतीदेवी महाविद्यालयात मालेगावच्या महात्मा गांधी विद्यालयात आणि नंतर मुंबईच्या कीर्ती महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाचे काम केले. या काळात नाट्य, संगीत चित्रपट क्षेत्रात त्यांची उमेदवारी सुरू होती. चिंतामणराव कोल्हटकरांच्या, 'ललितकलाकुंज', आणि मो. ग. रांगणेकरांच्या 'नाट्यनिकेतन' या संस्थांच्या नाटकातून त्यांनी विविध भूमिका केल्या १९५५ साली दूरचित्रवाणी प्रसारणाच्या विशेष शिक्षणासाठी युनेस्कोची शिष्यवृत्ती लाभून ते लंडनला गेले. दूरदर्शनच्या दिल्ली केंद्रातचा पहिला कार्यक्रम पु.ल.नी निर्मित केला होता. 'कुबेर', 'भाग्यरेखा', वंदेमातरम् 'पुढचं पाऊल' 'संत चोखामेळा', अमलदार इत्यादी चित्रपटातून त्यांनी भूमिका केल्या 'मानाचं पान', 'देवबाप्पा' इत्यादी चित्रपटांना संगीत दिले. 'गुळाचा गणपती' या चित्रपटाची कथा दिग्दर्शन संगीत त्यांचे होते. त्यात त्यांनी भूमिकाही केल्या. भाग्यवान, अंमलदार, तुझे आहे तुजपाशी, सुंदर मी होणार ती फुलराणी इत्यादी नाटके लिहिली. आणि दिग्दर्शित केली.

अशा या हरहुन्नरी अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या साहित्यिकाने बहुश: विनोद लेखन करून अजोड लोकप्रियता मिळवली श्रोत्यांना खदखदून हसवणारा वक्ता म्हणून ते प्रसिद्ध झाले. 'बटाट्याची चाळ' खोगीरभरती यासारख्या एकपात्री प्रयोगाचे बहुली खेळ करून श्रोत्यांना रिझवले आणि विनोदाची कधी अवखळ तर कधी [illegible]

शस्त्रासारखा वापर करून श्रोत्यांनावाचकांना अंतर्मुख केले. समाजाच्या समग्र संस्कृतीला व्यापून उरणारा कलावंत या शब्दात कुसुमाग्रजांनी पु.ल.चे मोठेपण विशद केले आहे.

पु.ल.नी १९४३ च्या सुमाराला लेखन सुरु केले. 'तुका म्हणे आता' (१९४८) हे त्यांचे पहिले नाटक खोगीरभरती (१९४९) या संग्रहात त्यांचे विनोदी लेख संग्रहित झाले त्यानंतर अंमलदार (१९५२) भाग्यवान (१९५३) 'तुझे आहे तुजपाशी' (१९५७), सुंदर मी होणार (१९५८) ही नाटके आणि तीन पैशांचा तमाशा (१९७८), राजा ओयादिपौस (१९७९), ती फुलराणी (१९७४) ही आधारित नाटके 'काय वाट्टेल ते होईल (१९६२), एका कोळियाने (१९६५), या अनुवादित कादंबऱ्या मोठे मासे आणि मासे (१९५७), विठ्ठल तो आला आला (१९६१), आम्ही चाटिले ना बोलू (१९५७) हे एकांकिकासंग्रह पुढारी पाहिजे. (१९५१) हे लोकनाट्य गांधीजी (१९७०) हे चरित्र ही पु.ल.ची उल्लेखनीय वाङ्मयनिर्मिती परंतु. पु.ल.ची ना मराठी माणसाच्या मनात अढळ स्थान मिळाले ते त्यांना नसती उठाठेव, (१९५२) 'बटाट्याची चाळ' (१९५८) गोळाबेरीज (१९६०) असा मी असा मी (१९६४) हसवणूक (१९६८) या संग्रहातील विनोदी लेखनामुळे 'व्यक्ती आणि वल्ली (१९६२) या व्यक्तीचित्रामुळे आणि अपूर्वाई (१९६०) पूर्वरंग (१९६२) या त्यांच्या प्रवासवर्णनामुळे त्यांचे हे लेखन मध्यमवर्गीय मराठी माणसाने उचलून धरले कारण त्यांच्या लेखनात मध्यमवर्गीय माणसाची सुख दुःखे ~~बदल~~ बदलत्या सामाजिक आर्थिक परिस्थितीने त्यांच्या मनात निर्माण झालेला. संभ्रम त्यांच्या वागण्यातील अंतर्विरोध आणि विचारांतील विसंगती त्यांच्या विनोद लेखनाने टिपल्या पु.ल.च्या विनोदात उपरोध वा उपहास नाही त्यांचा विनोद निर्मळ अवखळ खेळकर निरागस आहे. कोट्या श्लेष, अतिशयोक्ती विलक्षण कल्पकता हे त्यांच्या विनोदाचे विशेष आहेत. त्यांची रसिकता अभिजात सौंदर्यदृष्टी गुणग्राहकता

daram®
FOR EDUCATIONAL USE

कलागुणांनी वेडावून जाणारी विभोर होणारी वृत्ती आणि जीवनाकडे पाहणारा. । म निर्मळ प्रसंग दृष्टिकोण हे सारे त्यांच्या लेखनातून प्रतिबिंबित केले. त्याने वाचक अभिमंत्रित होतो., जगण्यातले सारे प्रश्न. समस्या विसरून निर्मळ वाङ्मयानंदात बुडून जातो

पु.ल नां १९६६ साली 'पदमश्री' व १९९० साली 'पदमभूषण' किताब देऊन गौरविण्यात आले. 'पु.ल देशपांडे प्रतिष्ठान स्थापन करून अनेक देणग्या ~~देऊन~~ देऊन त्यांनी सामाजिक वाङ्मयीन कार्याला गती दिली.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# ग्रंथसंपदा

(१) तुका म्हणे आता, अंमलदार, भाग्यवान, तुझे आहे तुझपाशी, सुंदर मी होणार, तीन पैशांचा तमाशा, राजा ओयदिपौस, एक झुंज वाऱ्याशी, ती फुलराणी, वटवट वटवट, मोठे मासे छोटे मासे, विठ्ठल तो आला आला, आम्ही लटिके ना बोलू, वयं मोठं खोटम्, नवे गोकुळ, पुढारी पाहिजे.

(२) अपूर्वाई, पूर्वरंग, जावे त्यांच्या देशा, व्यंगचित्रे.

(३) खोगीरभरती, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज, हसवणूक, बटाट्याची चाळ, असा मी असा मी, खिल्ली, कोट्याधीश पुल, अघळपघळ, उरलंसुरलं, पुरचुंडी.

(४) मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास.

(५) चित्रमय स्वगत

(६) चार शब्द, दाद.

(७) रसिकहो, मित्रहो, श्रोतेहो

(८) व्यक्ती आणि वल्ली, गणगोत, मैत्र, आपुलकी, गुणगाईन आवडी, गांधीजी.

(९) एका कोळियाने, काय वाटेल ते होईल, कान्होजी आंग्रे, टेलिफोनचा जन्म, पोरवय, स्वगत.

(१०) रवींद्रनाथ :- तीन व्याख्याने.

(११) पु.ल. एक साठवण.

## [illegible]

(১) [illegible]



(২) [illegible]

(৩) [illegible]

(৪) [illegible]

(৫) [illegible]

(৬) [illegible]

(৭) [illegible]

(৮) [illegible]

(৯) [illegible]

(১০) [illegible]

(১১) [illegible]

# चित्रपटसृष्टीतील योगदान

| साल | चित्रपट | सहभाग |
|---|---|---|
| १९४७ | कुबेर | भूमिका - पार्श्वगायन |
| १९४८ | भाग्यरेखा | भूमिका - पार्श्वगायन |
| १९४८ | वंदेमातरम् | भूमिका - पार्श्वगायन |
| १९४९ | जागा भाड्याने देणे आहे | पटकथा - संवाद |
| १९४९ | मोठी माणसे | संगीत |
| १९४९ | मानाचं पान | पटकथा - संवाद - संगीत |
| १९४९ | देव पावला | संगीत |
| १९५० | नवराबायको | कथा - पटकथा - संवाद - संगीत |
| १९५० | पुढचं पाऊल | भूमिका - पटकथा - संवाद |
| १९५० | जरा जपून | पटकथा - संवाद |
| १९५० | वर पाहिजे | पटकथा - संवाद |
| १९५० | गोकुळचा राजा | कथा - पटकथा - संवाद - गीते |
| १९५० | जोहार मायबाप / ही वाट पंढरीची | भूमिका |
| १९५० | कल्याण खजिना | पटकथा - संवाद |
| १९५२ | दुधभात | कथा, पटकथा, गीते, संगीत |
| १९५२ | घरधनी | पटकथा - संवाद, गीते, संगीत |
| १९५२ | संदेश | पटकथा |
| १९५३ | माईसाहेब | पटकथा - संवाद - संगीत |
| १९५३ | महात्मा | कथा |
| १९५३ | विठ्ठलपायी | संगीत |
| १९५३ | अंमलदार | भूमिका, कथा, पटकथा, संवाद |
| १९५३ | देवबाप्पा | पटकथा, संवाद - गीते - संगीत |
| १९५३ | नवे बिऱ्हाड | कथा, पटकथा - निवेदन |
| १९५४ | गुळाचा गणपती | भूमिका, कथा - पटकथा |
| १९५३ | फूल और कलियाँ | कथा |
| १९६३ | आज और कल | कथा |
| १९७१ | चिमणराव गुंड्याभाऊ | प्रस्तावना, निवेदन |
| १९९३ | एक होता विदूषक | पटकथा - संवाद |

संदर्भ - महाजाल आणि लोकप्रभा २३, जून २०००.

# व्यक्ती आणि वल्ली

## पु. ल. देशपांडे यांनी साकारलेली पात्रे

| | |
|---|---|
| नारायण | लखू रिसबूड |
| हरितात्या | बापू काणे |
| नामू परीट | ते चौकोनी कुटुंब |
| सखाराम गटणे | तो |
| नंदा प्रधान | हंड्रेड परसेंट पेस्तनकाका |
| बोलट | बबडू |
| भय्या नागपूरकर | अंतू बर्वा |
| नाथा कामत | |
| दोन वस्ताद | |
| गजा खोत | |
| अण्णा वडगावकर | |
| परोपकारी गंपू | |
| चितळे मास्तर | |

# मला घडवणारे शिक्षक

पु. ल. देशपांडे शाळेत होते तेव्हा त्यांच्या वर्गात पंचवीस ते सव्वीस मुले होती. ही पन्नास - पंचावण्ण वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. वर्ग इतका लहान असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांना शिक्षक खूप चांगले ओळखत असत त्या मुलाच्या घरची परिस्थिती कशी आहे, तो कुठे राहतो त्याचे मित्र कोण? हे सगळं शिक्षकांना ठाऊक असायचे. बरेचसे शिक्षक अभ्यासाव्यतिरिक्त एखाद्या मुलामध्ये चित्रकला, गायनकला, खेळ असे विशेष गुण आढळले तर खूप प्रेमाने उत्तेजन द्यायचे पु. ल. देशपांडे पार्ल्याच्या टिळक विद्यालयात शिकत होते. काही संतापीही होते. पण त्यांच्या संतापामागे विद्यार्थ्यांच्या भल्याची चिंताही असायची. डी. एन. भागवत नावाचे इंग्रजीचे शिक्षक होते. आमच्या वर्गातल्या ज्या मुलांना इंग्रजीची आवड असे त्यासाठी ते शाळा सुटल्यावर स्वतःच्या घरी तासभर वर्ग घ्यायचे. फी वगैरे काही नाही. इंग्रजीत मागे पडणाऱ्या मुलांनासुद्धा असेच विनामूल्य शिकवायचे. पु. ल. देशपांडे शाळेत शिकत होते, तो महात्मा गांधींनी चालू केलेल्या चळवळीचा काळ होता. आमची शाळा इंग्रजी सरकारकडून अनुदान घेत नव्हती. लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ ही शाळा निर्माण करण्यात आली या शाळांना राष्ट्रशाळा म्हणत. सरकारी शाळांच्या मानाने शिक्षकांना पगारही कमी मिळायचा, ध्येयवादी शिक्षक त्यांच्या मनांमध्ये देशाविषयी प्रेम निर्माण व्हावे, चैन, पोशाखीपणा, ऐषोआराम

ही वृत्ती मुलांमध्ये असावी यासाठी शाळेमध्ये स्वदेशी वस्तुंचे प्रदर्शन भरवले जायचे. उत्तम व्याख्याने व्हायची. मुलांचे शारीरिक आणि मानसिक बळ वाढवण्यासाठी निरनिराळे कार्यक्रम चालत. पु. ल. देशपांडे यांची साहित्य, संगीत, नाटक गोष्टींची आवड पाहून त्यांना उत्तेजन दिले 'तू चांगला लेखक होशील. नाटकात चाँगलँ काम करू शकशील संगीतात प्रगती करशील." असा नुसता आशीर्वादच नव्हे तर आत्मविश्वासही निर्माण केला. तसेच पु. ल. देशपांडेंना तारकुंडे शिक्षकांची खूप आठवण येत आहे. तारकुंडेमास्तर पु. ल. देशपांडेंना फिजिक्स - केमिस्ट्री शिकवायचे. तसेच मैदानावर आमच्याबरोबर क्रिकेट खेळत स्नेहसंमेलनात नाटक बसवत. पु. ल. देशपांडे पंधरा वर्षांचे होते. तेव्हा त्यांच्या मनात नाटकाची ओढ निर्माण झाली. पु. ल. देशपांडे यांनी नाटकात स्त्रीपात्रविरहित रंगावृत्ती तयार केली होती. तारकुंडे मास्तरांनी पु. ल. देशपांडेंचे कौतुकच केले नाही. तर स्वतःचे नाटक आम्हा विद्यार्थ्यांकडून बसवून घेतले. पु. ल. देशपांडेंनी त्या नाटकात संभाजीचे काम केले होते. १९३४ साली म्हणजे पन्नास वर्षांपूर्वी पाठ केलेल संभाजीचे स्वगत पु. ल. देशपांडेंना आज ही आवडते "सृष्टीची उलथापालथ तर झाली नाही ना! मुडद्यांना नेत्रपर्वत तर मिळाला नाही ना! वडवानळाने समुद्र तर जळला नाही ना!" मग आम्हीच असे कमनशिबी कसे! नाटकात भाषण दणाकून झाल्यावर कडाडून पडणाऱ्या टाळ्यांचा पहिला अनुभव पु. ल. देशपांडेंनी त्यावेळी घेतला. तारकुंडे मास्तरांना मुलांवर कधी रागवावेच लागले नाही. तारकुंडे मास्तरांनी तसे चांगले उंचेपुरे होते. धिप्पाड म्हणावे अशी देहयष्टी होती.

पण बोलण्यात इतका जिव्हाळा ~~[illegible]~~ होता. की फिजिक्ससारखा विषयही कवितेसारखा वाटायचा असे नारकुंडेमास्तर त्यामुळेच आम्ही सर्व मुल घडलो. असे पु.ल. देशपांडे यांनी सांगितले.

कलेतून जगाला अपार आनंद देणाऱ्या लोकांविषयी माझ्या मनामध्ये फार आदर आहे. पण "तू माझा "सांगाती" असं जर मी कोणाला म्हटलं असेलं तर ते चार्ली चॅपलीन आणि गुरुदेव टागोरे यांना!

– पु. लं. देशपांडे

# पुलंचे निवडक लेख.



FOR EDUCATIONAL USE

# रॉंग नंबर

माणसांसारख्या यंत्रांनासुद्धा काही जन्मजात खोडी असतात. असे पु. ल. देशपांडेंचे मत झाले आहे. नाटक रंगात आलेले असताना वीजपुरवठा गुल होण्यात एक आसुरी आनंद असतो. तसेच जेवायला बसलो असताना भरल्या ताटावरून उठवण्यामध्ये टेलिफोनला आनंद असतो. आपण जेवायला बसण्याची वार्ता ही टेलिफोनला कशी काय लागते कळत नाही. वैतागून उठून आपण टेलिफोन घेतो आणि पलीकडला माणूस विचारत असतो, " ढोलकिया पेट्रोल पंप ? "

क्षणापूर्वी वरणभाताचा घास गिळलेला असतो. आता राग गिळायची पाळी येते. अशा प्रसंगी " सॉरी रॉंग नंबर ! " हे शब्द आवाजाची पट्टी चढवू न देता उच्चारायला एक प्रकारची योगसाधनाच करावी लागते.

मर्ढेकरांनी जरी " ड्रिंग ड्रिंग जैसा खोटा नंबर हॅलो हॅलोला हलकट उत्तर " असं म्हटलेलं असलं तरी ते हलकट उत्तर दुसऱ्यांचं आपल्याला येणारं, आपलं दुसऱ्याला जाणारं नव्हे. कुठल्या तरी अनोळखी आवाजाला आपल्या तसल्याच एका अनोळखी आवाजानं हलकट उत्तर देणं हे हवेत लाठी फिरवण्यासारखं व्यर्थ आहे, ते असल्या उत्तरांची देवघेव झाली की कळतं.

पु. ल. देशपांडेना रॉंग नंबर आला की कोणा विद्यार्थ्याचे कॉलचे पैसे फुकट गेले, असा विचार करून 'मऊ मेणाहुनी', असा आवाज काढून, "सॉरी हं, रॉंग नंबर हं." असे म्हणत

मात्र हे रॉंग नंबर लागतातच कसे हे पु. ल. देशपांडेना पडलेलं कोडं आहे. खरं तर पु. ल. देशपांडेंकरता टेलिफोन तेच एक कोडे एक चकती फिरवतो काय, कुठे तरी घंटा वाजते काय आणि आपल्याला हवे असलेले गृहस्थ किंवा त्यांची मंडळी यांच्याशी संवाद सुरू होतो. काय सगळंच अजब !

दर वेळेला, इतर रचली हे आकडे आपल्याला संपर्क साधू देतात असं नाही. त्यातून काही यंत्रं ही चालण्यापेक्षा नादुरुस्त असण्याविषयीच अधिक प्रसिद्ध आहेत. टेलिफोन हे त्यातलंच एक यंत्र त्यामुळे टेलिफोन - कर्मचाऱ्यांच्या महत्त्वाचा कार्यक्रम रस्ते खोदून आत गाडलेल्या तारांना ठिकाणावर आणणे हा असतो. जमिनीखाली गाडलेल्या त्या तारांतून अनेकांच्या लोकांच्या संभाषणे चालू आहेत, हे लक्षात आले, की हा सगळा मामला मला तरी भुताटकीचाच वाटतो. असे पु. ल. देशपांडे यांनी म्हटले आहे.

(3)

पु. ल. देशपांडेंच्या लक्षात आले की आयुष्यात रॉंग नंबर टेलिफोनवरच लागतात असे नाही, अनेक ठिकाणी लागतात. गाणं ऐकायचंला रेडिओचं बटण दाबलं, की बाजारभाव ऐकायचला मिळतो. टी. व्हिवर 'छायागीत' असेल म्हणून कळ फिरवावी तर दोन-तीन डॉक्टर-डॉक्टरणी क्षयरोगप्रतिबंधक योजना समजावून सांगतात.


अशा प्रकारे 'रॉंग नंबर' या लेखात टेलिफोनमुळे होणाऱ्या गंमती-जंमती पु. ल. देशपांडे यांनी खुलवून सांगितल्या आहेत.


# घरगुती भांडण


संसाराला बहिणाबाई चौधरींनी उपमा दिली आहे. दोन-चार चटके लागल्याशिवाय खरपूस भाकरी मिळायची नाही. थोडक्यात म्हणजे संसार ही सुखावरची नसली तरी तापलेल्या तव्यावरची पोळी आहे. वातावरण थंड असलं तर थंड स्वयंपाकाइतकाच संसारही बेचव ! अधूनमधून वाहणारे उष्ण वारे संसार कसा उबदार ठेवतात आणि म्हणून संसारातल्या बारीकसारीक चकमकीतून उडणाऱ्या ठिणग्यांना महत्त्व आले आहे. लग्नपत्रिकेत छत्तीस गुण जमतात की नाही हे मोठ्या बारकाईने पाहिले जाते आणि अशा ह्या छत्तीसगुणी पत्रिका लग्नानंतर एकत्र आल्या की त्या पत्रिकांतील गुणांपेक्षा छत्तीस या आकड्याचंच काही विशेष वजन वाढू लागतं. अधूनमधून कुणाच्या तरी बत्तिशीचा गुण म्हणत नाही तर काही म्हणा, एरवी अतिशय प्रेमात वागणारे जोडपे एकदम छत्तिसाच्या थाटात एकमेकांकडे पाठ फिरवते.


पंचविशीत भांडण्याचा प्रश्नच नसतो. तिशीत पुरुषाला तरी निदान भांडायला सवड नसते. कारण तो त्याच्या येन कर्तबगारीचा काळ पानात पिठलं आहे की श्रीखंड आहे याची चर्चा करायला त्याला वेळेच नसतो. पण एकदा परिस्थितीपर्यंत सगळे स्थिरस्थावर झालं की छत्तिशी सुरू होते; आणि अंबाडीची भाजी शिजून तयार झाली की शेवटी फोडणी पडावी तशी घरगुती भांडणाची फोडणी तिथे पडते. विशीपंचविशीत भांडणे होतात, पण त्याला तिखटमिठाची चव यावी इतकी ती टिकत नाही. म्हणजे वळवाच्या सरीइतकीदेखील ती टिकाऊ नसतात त्यामुळे भांडण चांगले रुजतच नाही. बरं भांडणात मुद्देही फार नसतात. छत्तिशीत संसाराचं दशके गाठलेले असते. कलहकार्याला आज गेली दहा वर्षे पाहतायत. पु. ल. देशपांडे गेली दहा वर्षं सोसतायत. पु. ल. देशपांडेंना असा संकल्प सोडून सुरुवात करता येते; आणि भांडणाचं कारण लपवणं हे तर भांडणातलं खरं कसब. "तुम्ही मला लुगडं आणतो असं कबूल करून लुगडं आणलं नाहीत." अशी स्पष्ट नोटीस बजावणेत येत आहे

यात भांडण झाल्याचं माझ्या चोरूनदेखील ऐकिवात नाही. आम्हीही काही भांडणं ऐकली आहेत. काही काही चांगली भांडणं ऐकली आहेत ज्यात नवऱ्याच्या चतुराईनं मी मी म्हणणाऱ्या मुत्सद्द्यांना विचार करायला लावला असला अशी भांडणे ऐकली आहेत.











# फसवणूक / हसवणूक.

जन्म आणि मृत्यू ह्या दोन टोकांच्या मध्ये फक्त नियतीने चालवलेली आपणा साऱ्यांची फसवणूक एकदा लक्षात आली की त्यातून सुटायला आपली आणि आपुलकीने भोवताली जमणाऱ्या माणसांची 'हसवणूक' करण्यापलीकडे आणखी काय करायचं?

पु. ल. देशपांडे.

१. आमचा धंदा : एक विलापिका १९६१

माणूस जगण्यासाठी अमूक एक धंदा कसा निवडतो, ह्याचे मला पहिल्यापासून गूढ आहे. लॉंड्री काढणारा माणूस घ्या! हा किराणा-भुसार मालाचे दुकान न काढता लॉंड्रीच का काढतो? दुसऱ्याचे कपडे धुऊन किंवा हरवून दाखविण्याची ईर्षा जन्मतःच माणसात निर्माण होत असेल का? धंद्याची निवड ही आनुवंशिकतेवर आहे, म्हणावे, तर विशिष्ट धंद्याचा भरपूर आधार असलेली लोक ही विशिष्ट धंदाच का करतात? ह्याचा मी ह्या विषयाचा खुलासा करून घेण्यासाठी अनेकांच्या मुलाखती घेतल्या. उदाहरणार्थ, आमच्याच आळीतल्या डॉक्टरांना गाठले.

" या!"

डॉक्टर अगदीच 'निरोगी' नाहीत. पण मी गेलो. त्या वेळी दवाखान्यात फक्त एकदोनच माणसे होती. त्यांपैकी एकाला सिकनोट हवी होती, आणि दुसरा हातात भरलेली बाटली घेऊन काहीतरी विचारण्याच्या पोजमध्ये उभा होता. सिकनोटवाल्याने डॉक्टरांशी केलेल्या वाजवीपेक्षा दीर्घ हस्तांदोलनातून दोन रुपयांची एक नोट इकडून तिकडे सरकलेली मी पाहिली. त्यानंतर डॉक्टरांनीही कारण नसताना खिशात हात घालून हातरुमाल काढला.

आणि नोट घेतली. वास्तविक, त्यांनी ते दोन रुपये ठणठणीत माणसाला रुग्ण ठरविण्याबद्दल घेतले. त्याबद्दलही दुःख नव्हते. नाहीतरी तो इसम काम न करता पगार पदरात पाडून घेणारा होता. त्या प्राप्तीचा काही वाटा त्याच्या लबाडीत भागीदारी करून डॉक्टरांनी उपटला. हे जनरीतीला साजेसेच झाले.

"हं, काय? हा प्रश्न त्या बाटलीवाल्याला होता.

"नाही, खाण्याच्या बाबतीत काय करायचं?"

"साबूदाण्याची लापशी घ्या, फळं खा मुसंबी वगैरे. हवं तर अंडं उकडून खा-"

"हे सगळं जेवणापूर्वी, का जेवणानंतर?"

"जेवणाऐवजी."

तो गृहस्थ आपत्तीत पडल्यासारखा चेहरा करून निघून गेला आणि मी उरलो.

"बोला, काय होतंय? अहो, तुम्ही विनोदी लेखक. तुम्हालां कसलं काय व्हायला! हँ हँ हँ हँ!" डॉक्टर

तरी बरे. मी ह्याच डॉक्टरांचा पेशंट आहे. त्यांच्या त्या 'हँहँ'ला एक चांगला डोस द्यावा. असा विचार माझ्या मनात आला होता. पण माझा 'उद्देश' निराळा होता. 'उद्देश-पेक्षा' 'इरादा' शब्द अधिक बरा. माझे इरादे निराळे होते. मी माझ्या संशोधनकार्याच्या निमित्ताने आलो होतो.

"त्याचं असं आहे डॉक्टरसाहेब. मी आपल्याला एक खाजगी प्रश्न विचारणार आहे."

"खाजगी म्हणजे...? डॉक्टर माझ्याकडे संशयाने पाहू लागले.

"खाजगी म्हणजे... तसं खाजगी नाही, पण नाही म्हटलं तरी खाजगीच! तुम्ही हा डॉक्टरचा व्यवसाय कां पत्करलात?"

"खरं सांगू का? पण हे तुम्ही छापणार नाही नां कुठं?" डॉक्टर सावधानगिरीच्या स्वरात म्हणाले

लेखकांच्या बाबतीत एक सार्वत्रिक गैरसमज आहे. तो दिवसातून जो काही ऐकतो, त्याची रात्री आपल्या साहित्यिक कीर्द-खतावणीत नोंद करतो. असा एक विलक्षण प्रवाद आहे. तो साफ खोटा आहे, हे वाचकांनी ध्यानात घ्यावे.

"हो, हो!"

"मग सांगतो. छापण्यासाठी असेल, तर लिहून द्या. आपल्या भारतात..."
"नको, नको!" मी व्याकूळ होऊन म्हणालो. 'आपल्या भारतात'
ह्या शब्दांनी सुरुवात होणाऱ्या प्रत्येक लेखी आणि तोंडी वाक्याचा मी
लहानपणापासून धसका घेतला आहे. "छापण्याची मुलाखत नको, खरी हवी."
"ठिक आहे. चहा घेणार का?"
"पण तुम्हीच तर मला चहा कमी करायला सांगितलात!"
"अहो, ते डॉक्टरांच्या भूमिकेतून विनोदी लेखक असून इतकी विनोदबुद्धी
कशी नाही तुम्हाला? गोपाळराव, दोन चहा सांगा समोरच्या इराण्याकडे."
"गोपाळरावला मुद्दामच पिटाळला. तुम्हाला खरं सांगतो, मला डॉक्टर
मुळीच व्हायचं नव्हतं मी वकील होणार होतो."
"का?"
"अगदी खरं सांगतो" स्टेथास्कोपवर हात ठेवून ते म्हणाले, "चुकून डॉक्टर
झालो. पुरती ह्या धंद्यात राम नाही."
"असं कसं म्हणता? परवा तर नवी गाडी घेतलीत सोळा हजाराची-"
"ऑन रोड सोळा हजार चारशे अठराला पडली."
"हा!"
"पण सुख पैशात नाही."
"वा! पण डॉक्टरांना समाजात मान केवढा देतात लोक?"
"आजारी लोक! हेल्दी लोक विचारतात का आम्हाला? तुमचा हेवा वाटतो मला."
"अहो, तुमची व्याख्यानं होतात. हजारो लोक जमतात-"
"पण त्यांत सगळेच हेल्दी नसतात. टीकाकार नावाची एक जात आहे,
डॉक्टर निद्रानाश, बद्धकोष्ठ असल्या रोगांनी पीडित असते ती हसत नाही
ती कशी पोट धरून हसणं पाप समजतात."
"अहो, ते अपवाद. पण आमच्याकडे नुसतेच रोगी!"
'तात्पर्य, तुमच्या धंद्यात राम नाही. म्हणता?
"राम नाही, सीता नाही, काही नाही - नुसता वनवास आहे! का?
त्यानंतर मी वकील पकडले. त्यांतल्या सहापैकी तिघांना अनुक्रमे फौजदार,
नट आणि खलाशी व्हायचे होते. उरलेल्या तिघांनी "वकील होण्यापेक्षा
भीक मागावी", असा मला सल्ला दिला.

त्यानंतर मी मोटार-ड्रायव्हरला भेटलो. त्याची महत्त्वाकांक्षा हॉटेल काढण्याची होती. "साले गल्ल्यावर बसतं आरामात - आन् पैसा करावा! ही साली झिगझिग साला ट्रक चालवण्यापेक्षा बरे झाडणं वरं! निदान रात्री आपले आपल्या बायकापोरांत तरी बसता येतं!"
थोडक्यात काय तर कुणीही स्वतःच्या धंद्यात सुखी नाही.

## माझे खाद्यजीवन

थोडे कडू, थोडे गोड, पण बरेचसे तिखट

एका जुनाट घरातले स्वैपाकघर आहे. काळोखे कोनाड्यात रॉकेलची चिमणी भगभगते आहे. एके काळी लाल असलेल्या पाटासमोर पत्रावळ मांडलेली आहे. चुलीवरच्या भाताला भांड्यातल्या - भांड्यात गुदगुल्या होत आहेत. पोटात भूक आहे डोळ्यांत नीज आहे. दारातून वाकून वडील आत येत आहेत. ते काहीतरी गुणगुणत आहेत. बंद पलीकडे खेळण्याच्या पाळण्यात धाकटा भाऊ टॅहँटॅहँ करुन रडणे आणि बोलणे ह्यांच्या सीमारेषेवरचे आवाज काढत आहे. झटक्यात निखा-यावर टाकलेल्या पापडाचा वास येतो. झोप उडायला लागत होते. पोटाची मागणी वाढते. "झाले ह" म्हणून आई तो चिमटीत धरुन फूडफूऽऽ करते. वडील शेजारच्या पाटावर बसतात. झटक्यात कढईच्या पोटात चर्र होते. पळीतून आंबाडीच्या भाजीच्या पोटात शिरलेली लसूण सा-या घराचा ताबा घेते. झोप पळते. पोटात खळखळ सुरू होते. चुलीच्या एका बाजूला भिंतीला पाठ लावून उभा असलेल्या भाकरी चतकोर-चतकोराने पानात पडतात. आंबाडीच्या भाजीचा खमंग वास घरात अडकलो खाण्याच्या कितीतरी आठवणी आज जिभेवर आहेत. त्या कधी-कधी अशा उफाळून येतात. अगदी भलत्या ठिकाणी येतात.
एका गरीब कारकुनी घरात वाढलो. घर कसले? पत्र्यांच्या भिंतीचे एक खोपटे. खेड्यातले नव्हे. मुंबईजवळच्या एका उपनगरातले. त्या वेळी माणसे मुंबईला येऊन अशी कोंबली नव्हती.

खाण्याच्या बाबतीत माणसे घरचे खाणे आणि बाजारचे खाणे असा एक ढोबळ पंक्तिप्रपंच करतात. खाण्यात घरालाही स्थान आहे आणि

बाजारलाही आहे. खादाडपणा हे एक प्रकारचे योगसाधन आहे. अनेक इंद्रियांवर विजय मिळवून खावे लागते. त्यात मुख्य आवरावे लागते ते स्वच्छतेचे इंद्रिय. त्यानंतर आरोग्याविषयक धाणसट कल्पना. आरोग्य ह्याचा अर्थ, वाटेल ते, वाटेल तेव्हा, वाटेल त्या ठिकाणचे आणि वाटेल तितके खाण्याची ताकद. खाण्याची साधना जसजशी वाढत जाते, तसतशी खूप खाण्याची प्रवृत्ती कमी होते. भाराभर खाणाऱ्या इसमाला 'खवैय्या' म्हणतात. ही चूक आहे. भाराभर गाणी म्हणून दाखवणाऱ्याला 'गवैय्या' म्हणण्याइतकी ही चूक आहे! खाण्याच्या पहिल्या उमेदीच्या भरात खूप खात जाण्याकडे प्रवृत्ती असते हे ठीक आहे. पण त्यानंतर पारख यावी लागते. खरा मत्स्याहारी सरंग्याचा एकच तुकडा किंवा मालवणी परिभाषेत 'कुडकी' सगळ्या जेवणाबरोबर पुरवतो.

खाण्याचा आसनाशी फार संबंध आहे. पाटावरचे जेवण चांगले की टेबलावरचे वाईट, असे क्षुद्र विचार जातीच्या खाणाऱ्याला नसावेत. काही गोष्टी तर चालत-चालत खाण्याच्या आहेत. उदाहरणार्थ, चणेफुटाणे हे कधीही बसून खाऊ नयेत. उसाचे कांडे चालता-चालता तोडीत जावे. भेळ बसून खावी. पण पाणीपुरी आणि भेलपुरी उभ्याने. भाजलेले शेंगदाणे वाटीत घालून एखादे पुस्तक वाचता-वाचता पडल्या पडल्या खावे. मिठाई शक्य तितकी खावू नयेच; पण खायचीच झाल्यास खुर्चीवर बसून खावू नये. बिछान्यावर बसून खावी.

तसेच दाराशी आलेल्या यमदूताच्या नाकात जर खणखणीत लसणीची फोडणी गेली, तर तो खाणारावरचा आपला हात निश्चित खाण्यावर नेईल. स्वर्गात अमृत असेल. पण लसणाची फोडणी दिलेली अंबाडीची भाजी कुठून असणार? कांदालसूण खाण्याचे भाग्य देवांच्या नशिबी नाही!

बिगरी ते मॅट्रिक
एक भारी बिकट वाट

बिगर इयत्तेपासून ते मॅट्रिक होईपर्यंत माझे सारे आयुष्य मोठ्या हालाखीत गेले. शैशव, बाल्य, कौमार्य, पौगंड असल्या अवस्थांच्या जाळपोळीचा हा इतिहास आहे. तशी माझी काही म्युन्सिपालटीच्या दिव्याखाली बसून अभ्यास करायची परिस्थिती नव्हती. असती तर एव्हाना त्याच्या माणसासारखा माणूस होण्याऐवजी चरित्रनायक झालो असतो. मला कधी वारावर जेवावे लागले नाही. मधुकरी मागावी लागली नाही. आई जेवू घालीत असे. बापाने भीक मागण्याची परवानगी देण्याचा प्रसंग आणला नाही. वर्षाकाठी दोन-चार सदर्‍या तुमानी आणि पैरणी मिळत. पैरणीऐवजी कॉलरचा शर्ट असावा, असे वाटे. पण लहान मुलांना "काराश्यात कशा रे कालरी?" असे महादेवराव शिंप्याचे मत असे. याचे खरे कारण फार उशीरा कळले. त्याला कॉलरीचे शर्ट शिवता येत नसे. पण सणासुदीसाठी म्हणून ठेवणीतली एखादीदेखील होती. चांगली नवी भिकबाळी कानात घालून मुंज लागण्याइतक्या सुखवस्तू कुटुंबात मी जन्मलो होतो. ह्या भिकबाळीवरून आठवले. हा अलंकार कान पिळण्याच्या जागेवरून कायमचा उठला, हे मला फार मोठे समाधान आहे.
भिकबाळीसकट कान पिळून घ्यायची सालंकृत शिक्षा ज्यांनी भोगली आहे, त्यांनाच माझ्या समाधानाच्या सुस्कारामागची पिळदार वेदना कळावी. वास्तविक ही चांगली सोन्या-मोत्यांची मढलेली बाळी. तिला भिकबाळी करण्याचे डोहाळे कुणाला आठवले कोण जाणे. कदाचित एखाद्या भिकशेट सोनाराने हा अलंकार शोधून काढला असावा. आणि आपले मत या बाळीला जोडून दिले असावे. पूर्वीच्या काळी स्वतःचे नाव देवाच्या चरणात गुंफायचे तसे. सांगायचे मुद्दा लहानपणी मला भिकबाळी होती, जरीची टोपी होती. परंपरेने चालत आलेला मखमालीचा सूट होता. तसे काहीही कमी नव्हते. पण बालपण सुखात गेले म्हणताना जीभ अडखळते.

शालेय जीवनात गणित, भाषा, इतिहास, भूगोल, ड्रॉइंग आणि व्यायाम हे विषय. त्यातला गणित हा बलाढ्य मी ह्यापैकी एकही विषयात चमकलो नाही, पण कुणाशीही मैत्री जमली नाही. एखादया दुबळ्या राष्ट्राने सर्वांशी मित्रभाव ठेवून असावे तसा राहिलो. पण ह्या साऱ्या विषयांशी माझ्या बालपणाला वाळवी लागली होती. रात्रंदिवस ती माझे बाल्य पोखरीत होती. मी पाढे हडहड म्हणत असे, पण हाबरून. त्यांतल्या तेरा, सतरा, एकोणीस, तेवीस आणि एकोणतीस यांच्या पाढ्यांना मी आजही भितो. त्या संकटातून सुटत सुटत तिसाच्या किंवा तिसाच्या पाढ्यावर आलो की आपल्या पोटात एक चिमुकले अंडे आहे. आणि त्यात जीव नावाची वस्तू पडल्यावर गार वाटले, याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. मॅट्रिक नावाच्या जीवनावरच्या दुखण्यातून उठल्यानंतर पुन्हा माझा कधीही ह्या तेरा-सतरा-एकोणीस-एकोणतिसशी संबंध आला नाही. पाऊणकी, सवायकी, अक्करकी, औटकी ह्यांतली प्रत्येक कालजन्मीची चेटकी आहे. यावर माझा नितांत विश्वास बसायचा चेटक्या लहान पोरांना पकडतात म्हणे ह्या चेटक्यांनी माझे बाल्य धळले. दामले मास्तरांना बाल्य आलेच नसावे. माझ्या वर्गातल्या अस्त्या वारांगणकराने एकदा मला हळूच सांगितले होते की, " ते खरे हरणटोळ आहेत. पण दिवसा मास्तराचे रूप घेऊन येतात." सगळी पोरे त्यांना हळूच 'हरणटोळ' असाच उल्लेख करीत. हरणटोळ नावाचा हिरवागार साप म्हणे माणसाच्या टाळूवर चावा घेतो. दामले मास्तरांनी आमच्या चिमुकल्या डोक्याची तीच दुर्दशा चालवली होती. पाढे, हिशेब आणि गणिते ही त्यांची आवडती हत्यारे. आम्हांला डोक्याबरोबर डोळे बिघडवणाऱ्या बारीक टाइपात छापलेले गोखल्यांचे अंकगणित असे. गणितवाले गोखले तेच गोपाळकृष्ण गोखले हे कळल्यावर पुढल्या सर्व पिढ्या त्यांना सोडून गांधीच्या मागे का गेल्या, हे गणित मला अचानक सुटले. गणिताच्या पुस्तकात चित्रे? माझ्या नासलेल्या बालपणी ड्राइंगच्या पुस्तकातदेखील ज्या रेघोट्या असत त्यांना चित्रे म्हणणे जिवावर येई. भूगोलाच्या पुस्तकात एकच चित्र राजाबाई टॉवर आणि वसईचा पूल असा निरनिराळा मजकूर घालून छापले होते. राजाबाई टॉवरचे चित्र

आडवे छापून त्याखाली 'बसईचा पूल' असे लिहले होते. हे मला फार उशिरा कळाले. ह्या गणिताच्या पुस्तकात चित्रे पाहून मला ते शिकण्याचे अंकगणित आठवले. आणि भडभडून आले. शिकण्याच्या गणितातला " बाळे लीलावती, जे तुजसाठी मी कर्णभूषणे आणली ?" यासारखा वात्सल्यपूर्ण मजकूर वगळला, तर बाकीचे सारे पुस्तक फुटके आणि गळके हौद, पाली, अ-ब आणि क-नामक मजकूर असलेल्या दुर्गंधीने भरलेले असायचे. हे चित्रमय गणित पाहून मला तर धक्का बसला. तेव्हापासून सिनेमानटींच्या अंगोपांगाचे दर्शन घडविणारी चित्रे हालणारी त्यांचेदेखील पाहायची मी माझ्या मनाची तयारी ठेवली आहे.

माझ्या लहानपणी साऱ्या चांगल्या चांगल्या गोष्टींचे 'धडे' झाले 'विषय' झाले. प्रत्येकावर शंभरापैकी इतके, पन्नासापैकी इतके, अशी किंमतीची लेबले लागली. सगळे शिक्षक विद्यार्थ्याला विषयाची गोडी लागेल म्हणून भीत असत. मला मराठी कविता आणि कादंबरी वाचायला अतिशय आवडत असे, पण मराठी हा विषय होऊन पुढे आला, की हलवायाच्या [illegible] मिठाईवर माश्यांनी बि-हाडे बसल्यासारखे वाटे. समुद्राच्या लाटा पाहण्यात जरी मी दिवसाच्या दिवस घालवले असले, आणि लाइफगार्ड सोडला तर कुणी घालवीलही नसावा. तरीदेखील अधूनमधून मी त्या पाहत असे. पण ह्याच लाटा भूगोलाच्या तासाला गुरुत्वाकर्षण वगैरे भानगडी आणीत. अशा वेळी वाटे की, मीठ आणि मासे उत्पन्न करायला देवाला समुद्र तयार करण्यापलीकडे दुसरे काही कां सुचले नाही ? "हे सागरा, तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून" अशा थाटात सुरू होणारा धडा मराठीद्वेष्टे वाघुंडे " हे सॉगा- तुझ्या ऑफट व्हिस्टाराकडे फावून " असा ख्रिस्ती कबरस्तानातल्या पाद्र्याच्या थाटात वाचून आपले इंग्लिश हाय असल्याचे भासवीत आणि त्या शब्दांच्या मजेदार आलबलाजीची होळी पेटवीत. त्यांच्या बापाचे नाव वेंकट आणि मुलाचे नाव मच्छिंद्र होते, अशा ह्या काळ्या मेणकापडाच्या वर्णाच्या इसमाने आपल्याला मराठी येत नसल्याचे थेट मिरवण्याचे कारण नव्हते.

# माशी

नुकतीच एका औषधाच्या बाटलीत माशी मरून पडलेली आढळली, आणि त्या माशीने देशभर मोठी खळबळ उडवून दिली. औषधात जावून मरणे हा चमत्कारिक योग आहे. औषध पोटात जावून माणसे मरू शकतात. पोटात जाणारे औषध आणि बाहेर येणारे प्राण यांची वाटेत गाठ पडल्याचीही कैक उदाहरणे आहेत. पण बंद कुपीत जाऊन आत्महत्या करणे हे एक अजब योगसाधन आहे.

माशी शिंकण्यावरून आठवले. मी काही स्वतः माशी शिंकताना ऐकली नाही. किंबहुना, मी अनेकांना हा प्रश्न विचारला. पण मुलाप्रमाणे हा प्रत्यक्ष अनुभव असलेली माणसे मला आढळली नाहीत. तरीही ती शिंकत असावी. त्याखेरीज लोक उगीच बोलणार नाहीत. नेहमी उघड्यावर वावरणाऱ्या माशीला सर्दी होणे स्वाभाविक आहे. प्रस्तुत दिवंगत माशीलादेखील सर्दी झाली असेल. औषधाच्या कारखान्यात अन्यत्र वावरणाऱ्या एखाद्या प्रौढ माशीने तिला सांगितलेही असेल की, " स्ट्रेप्टोमायसिनमध्ये एक बुचकळी घे, आणि दोन दिवस मिठाईवर जरा बेतानं बस. एवढी-एवढी साखर खा. पलीकडल्या वाण्याकडील चांगली उघड्यावर असते. शाळेपुढे गुडदाणीवाला बसतो, त्याच्या गुडदाणीवर बसत जा. पाच मिनिटं फार भूक लागली तर! एरवी थोडा खाण्यावर कंट्रोल हवा!" सरकारी कारखान्यात वावरणारी माशी असल्यामुळे 'कंट्रोल' वगैरे शब्द त्या प्रौढ माशीला येत असावेत. अशा प्रौढ माशीचे त्या तरुण माशीने ऐकले असावे, आणि सर्दीवर उपाय म्हणून ती बाटलीत शिरली. शिरता शिरता स्वतःच शिंकली आणि तिने हा अनर्थ ओढवून घेतला. तेवढ्यात वरचे झाकण बसले.

हा हन्त हन्त! "सर्दी बरी झाल्यावर हलवायाच्या दुकानात जाईन, हॉटेलात इतर मैत्रिणींना भेटायलाही जायचंय. तेवढ्यात रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या पोरांचंही होईल. दुपारी दोन घटका कुणाच्यातरी तोंडावर बसून येईन. मग जत्रेला जायचंय काल म्युनिसिपालटीच्या हापिसातली माशी म्हणाली होती.... बाकी त्या हलवायाच्या दुकानातल्या निळ्या

माश्या स्वतःला फार शहाण्या समजतात. आपल्यापोट्या ! आम्हाला जरा बसू देत नाहीत पेढ्यांवर सारखरफुटाणे म्हणून तरी किती खायचे ! तरी पावसानं मेहरबानी केली आहे. उद्या उघाडी आली की मात्र संचाईत ! ...." अशी नाना तऱ्हेची स्वाने रंगवीत सर्दी बरी करायला म्हणून बाटलीत शिरली. आणि गेली ती गेलीच

किंबहुना, भारतात माणसांहून माश्या अधिक आहेत. 'वंदे मातरम्' हा 'वंदे मक्षरम्' चा अपभ्रंश आहे, हे पटवणे अवघड नाही. फुढचं काय, पण "माती असशी मातित मिळशी" हे मुळात "माशी असशी माशीत मिळशी" होते, हेच खरे !

मला माश्यां मारण्याचा फार राग येतो. हातात ते जाळीदार उलथणे घेऊन फटाक-फटाक करीत माणसे माश्या कश्या मारतात, मला कळत नाही. मी एकदा तो प्रयत्न केला. माझी पत्नी मात्र सफाईने माश्यां मारते. जातीला जात वगैरे म्हणतात ते खोटे नाही. काही हॉटेलातून कागदाच्या पट्यांवर डिंक लावून माश्या पकडतात. हा दुष्टपणा आहे. जीवनदयामंडळ इथे लक्ष का देत नाही ? का त्यांचेही सदस्य माश्या मारीत बसले आहेत ?

ह्या साऱ्या दुःखात एकच सुख आहे की, जगातल्या निदान एका माशीच्या मृत्यूची तरी आता चौकशी होईल. मरणालादेखील सरकारी महत्व यावे लागते. तेव्हा हे भाग्य लाभते. एरवी, ती बाटली उघडकीला आली नसती. तरीदेखील ती माशी असंख्य माणसांना 'मरता मरता मरावे' म्हणत मेली असती. कसेही पाहिले. तरी तिचे ते शहीद बाटलीतले बलिदान व्यर्थ गेले नसते.

त्या माश्जितमक्षिकेस माझे प्रणाम !

# सात वारांची कहाणी

माझी आजी लहानपणी मला एक सात वारांची कहाणी सांगत असे. मला ती कहाणी आज आठवत नाही, पण ती सांगणाऱ्या आजीचा थरथर मंद आवाज आठवतो. वास्तविक ह्या कहाण्या म्हणजे झोपेच्या बाळगोळ्या होत्या. मंद प्रकाश, तुडुंब भरलेली पोट, आजीचा अधूनमधून पाठीवरून फिरणारा हात आणि मायेने भरलेल्या शब्दांची संथ धार ह्या रसायनातून ती बाळगोळी तयार व्हायची.
ह्या कहाणीत सात वार सात भाऊ होते.

पूर्वी म्हणजे फार फार पूर्वी.... हो, तेव्हा आताच्यासारखे नव्हतं, तेव्हा डोंगरांना पंख होते, आणि पशुपक्षी माणसांसारखं बोलत असे. झाडं बोलत होती,... त्या वेळी पूर्वेला ह्या वारांचा मोठा महाल होता. त्यात सात दालनं होती. हे सात भाऊ त्या एका महालात रहायचे खरे, पण त्यांना एकमेकांच्या दालनात जायची परवानगी नव्हती. ते फक्त दिवाणखान्यात भेटू शकत. तिथे सगळ्या सुखसोयी होत्या. ह्या आजीच्या सुखसोयीच्या कल्पना होत. सुस्वर गाणारे पक्षी, हिरव्या मोत्यांनी जडवलेली दाराखिडक्यांची तोरणं, सोन्याच्या समया, आणि बागेत बारमहा फळं देणारी हापूसची झाडं, कडबोळ्यांच्या वेली. लाडवांचे वृक्ष, करंज्यांची रोपं त्यांना लहान-लहान वांग्यासारख्या करंज्या लागत. कितीही खाल्लं तरी न संपणारी श्रीखंडाची वाटी आणि कितीही ओतलं तरी न संपणाऱ्या दुधाची चरवी एवढं सगळं असलं, तरी ह्या वारांना एक दुःख होतं, - म्हणजे एकाला दुसऱ्याच्या खोलीत न जाण्याच्या नियमांचं! त्यांच्यावर पहारा करायला इंद्रानं एक रक्ष नेमला होता. तो रक्ष त्यांना वाटेल ते देत असे. पण जरा कुठे जरा कुठे सोमवार मंगळवारच्या खोलीकडे गेला की ओरडत असे, "सबूर!" आजीच्या गोष्टीतला रक्ष हिंदी बोलायचा.

त्यातल्या त्यात शनीवारचा हा शनी सगळ्यात धाकटा रविवार सगळ्यात मोठा. शनिवार अतिशय खट्याळ होता. त्याने एकदा विचार केला, "हा काय ताप आहे? रवीच्या खोलीत काय आहे. मला का पहायला

पहायला मिळू नये ? "लहानपणी मलादेखील माझ्या कॉलेजात जाणाऱ्या मामाच्या खोलीत जाण्यास कुतूहल असे. त्याची वरच्या माळ्यावर गच्चीत एकुलती-एक खोली होती. मी चुकून त्या खोलीत गेलो की, मामा वसकन अंगावर येई. तो कॉलेजात गेला, की आम्ही त्याच्या दाराच्या फटीतून खोली पाहत होतो. झकास खोली होती. भिंतीवर खूप नायकांचे फोटो होते. वाढत्या वयाबरोबर त्या नायकांची नावेदेखील आम्हांला कळली. आणि मामाचे लग्न झाले; त्यानंतर त्या सगळ्या नट्या भिंतीवरून नाहीशा झाल्या. परवा खूप वर्षांनी आजोळच्या त्या खोलीत गेलो. मार्लिन डिट्रिचच्या जागी साईबाबा पाहिले, आणि मामाची दया आली. एका फळीवर आरसा, तेल आणि फणी-ब्रश असे. शेवटी शनीने एके दिवशी हिंमत केली. आणि ती हळूच स्वर्गाच्या खोलीत शिरला. दार उघडून आत पाऊल टाकले. आणि इंद्राच्या सिंहासनाला हादरे बसायला लागले. त्याने एकदम वरुणाला हुकूम सोडला सगळ्या पृथ्वीचा प्रलय करून टाक! आणि मग प्रचंड प्रलय झाला. बारा महिने हापूस देणारे झाड वाहून गेले, खीरीची वाटी वाहून गेली, करंज्यांची रेघरी, पंखवाले डोंगर बुडाले इंद्राने साती भावानां विभक्त केले. आणि ताकीद दिली, "याद राखून ठेवा. पुन्हा एकमेकांना भेटायचेदेखील नाही."

आज सातही वारांची सात घरे वेगळी, चुली वेगळ्या. सगळा शनीच्या चावटपणा वारांची ही गोष्ट अशीच तयार झाली. त्यावरूनच शनिवार नावाच्या ग्रहस्थावर माझे मन जडले. वास्तविक शनिवार हा इतरांच्या दृष्टीने न-कर्त्यासवार आहे. पण आजदेखील मला शनिवारचे आकर्षण विलक्षण आहे. जीवनात रंगणाऱ्या लोकांचा हा वार आहे. शनिवारी संध्याकाळी जसे जग दिसले, तसे रोज संध्याकाळी त्यांना पाहता आले, त्यांच्यासारखे भाग्यवान तेच ! अर्थात शनिवारचे मोठेपण रविवारच्या मोकळ्या स्वभावामुळे आहे हे अमान्य करू नये. रविवार हा काही झाले तरी दादा आहे कर्ता आहे. किंबहुना हरलेला कर्ता पुरुष आहे. पण आज साऱ्या जगाचे कर्तृत्व ह्या शनीमुळे आहे. नुसते शांतिपाठ सांगणारा हा 'बुध' जनांपैकी नव्हे. मनात आणील ते करणारा, चांगलेही करणारा, आणि वाईटही करणारा ! मंगळासारखा नुसतेच तारवटलेले डोळे

होऊन हिंडणारा नव्हे. मंगळवार हा मला नेहमी गांजेकसासारखा वाटतो. फक्त श्रावणातल्या मंगळवाराचे मात्र ह्यान बदलले. तसे ह्या मंगळवाराचे श्रावणामध्ये रूप झाल्या की काहीतरी होते. खालच्या माजघरात मंगळागौरीच्या हसण्या खिदळण्याच्या हिंगाणा सुरू झाला की, वरच्या खोलीतून पुस्तकातले लक्ष उडे. त्यातूनही सोमवार हा अत्यंत अरसिक वार ! पण त्याला फक्त पोटासाठी लोकांना राबायला लावायचे, इतकेच माहित हा तर अत्यंत रुक्ष आहे. हा मासे खात नाही. तसा गुरुवार देखील कांदा खात नाही. उपास करतो. पण दत्ताच्या पेढा खातो. शिकरण खातो. सोमवारला तेही सुख पचत नाही. मंगळवार निदान गांजा तरी ओढतो, चिडतो, दांडगाई मास्तरासारखा हा वार आहे. पण सोमवार नुसता नाकासमोर जाणारा. सोमवार कधी हसत नाही. मंगळवार हसतो, पण सिनेमातले व्हिलन किंवा राक्षस हसतात तसा हॅहॅहॅ त्याच्या मानाने बुधवार हा मात्र उगाच त्यात असतो. सात वारातला हा मधला भाऊ ह्या वाराला कोणत्याही प्रकारचे व्यक्तिमत्वच नाही. अकरा- साडेअकराच्या सुमाराला कसलेही वैशिष्ट नाही., रंग- रूप आकार नाही, त्याचप्रमाणे ह्या बुधवारला काहीही आगापिछा नाही. तसेच शुक्रवार देवीच्या देवळाभोवती शिट्या घालीत हिंडतो. आणि वर्षातून एकदा तरी स्वतःला 'संभावित शुक्रवार' म्हणवून घेतो. पण बुधवारच्या नशिबी काही नाही. हिंदूंचा गुरुवार. मुसलमानांचा शुक्रवार. यहुद्यांचा शनिवार आणि ख्रिस्त्यांचा रविवार पण बुधवार मात्र कुणाचाच नाही. अशी वारांची कहाणी सांगायची माझी आज्जी!

माझे पौष्टिक जीवन

कडकट्ट .... कळकट...

पोष्ट ऑफिस ही एक अजब गोष्ट आहे. तिथे पब्लिकसाठी म्हणून ठेवलेल्या टाकदौतीपासून ते आतल्या पोष्टमास्तरापर्यंत प्रत्येक चिजेवर कसला तरी निराळाच शिक्का मारलेला असतो. तो पोष्टाच्या इतर कुठल्याही शिक्काप्रमाणे अस्तित्व जाणवते. पोष्टात नोकरीला घेताना उमेदवारांना त्यांच्या चेहऱ्यावर काही विशिष्ट भाव, किंवा चेहऱ्यावर कुठल्याही भावांचा अभाव, पाहून निवडले जात असावे. इतर सरकारी खात्यातले कर्मचारी आणि पोष्टल कर्मचारी ह्यांच्या चेहऱ्यावरील भावांत मला नेहमी फरक वाटतो. इतर काही सरकारी खात्यातले लोक कसे 'तयार' वाटतात. कारकुनी फराट्याने कधी उडवून टाकतील हे सांगता येत नाही. पोष्टल कर्मचाऱ्यांचे तसले काही नसते. पाच पैशांचा स्टॅंप द्या, किंवा पन्नास रुपयांची कार्ड-पाकिटे द्या, निष्काम कर्मयोग्याच्या भावनेने ती ते देतात.

पोष्टाच्या इमारतीच्या घडणीतच काही निराळेपण आहे. भरपूर उजेड, वारा वगैरे खेळता कामा नये अशी दक्षता घेऊनच पोष्ट ऑफिसे बांधली गेली आहेत. फार उजेड असला तर पोष्टमन लोकांची पत्रे वाचत बसतील. म्हणून पत्ता वाचण्याइतपत उजेड असतो. वारा खेळला तर पत्रे उडून जातील, ही भीती असावी. काऊंटरची उंची आणि खिडकीच्या भोकाची उंचीदेखील पलीकडच्या मास्तरची टाळू आणि कपाळाचा काही भाग ह्याहून अधिक काही दिसू नये अशा बेताची असते. आज अनेक वर्षे मी आमच्या नाक्यावरच्या पोष्टात जातो आहे, पण अजून मी तिथला अखंड मास्तर पाहू शकलो नाही. खिडकीपलीकडल्या टाळूवर टक्कल दिसण्याऐवजी भांग दिसला की मास्तर बदलले, एवढे लक्षात येते.

खिडकीपलीकडला प्रत्येक लहान-मोठा मास्तर खाली मान घालून काही ना काही लिहीत असतो. ते लिखाण पावतीबिवतीच्या रूपाने कधी आपल्या हाती लागलेच; तर तो सांकेतिक लिपीतला मजकूर असावा असे वाटते. पोष्टातून मिळणाऱ्या पावतीवरची अक्षरे ज्याला वाचता आली, तो काय उद्या एखाद्या डॉक्टरचे प्रिस्क्रिप्शनसुद्धा वाचील. अक्षरांची ती अगम्य गिचमीड पोष्टाच्या वंशाला गेले तरच कळले.

चाळशी

काही दिवसांपूर्वी माझा चष्मा फुटला. इ.स. एकोणिसशे चाळीसच्या जून महिन्यात माझ्या डोळ्यांवर पहिला चष्मा चढला. म्हणजेच आला त्यापूर्वीचा काळ मला स्वच्छ दिसतोय! एकाएकी लोकलगाडी बोरिवली आहे की वांद्रा ते नीट दिसेनासे झाले. प्लॅटफॉर्मवरच्या इंडिकेटरचे काटे कुठे आहेत ते जवळ जाऊन पाहावे लागले. पलीकडच्या फुटपाथवरच्या लाल रंगीत चित्राच्या ब्लॉक सरकत्यावर दिसतात तशा दिसू लागल्या आणि आपल्या डोळ्यांनी आपल्याला फार लौकर दगा दिला ही खात्री पडली. नाकाखाली मिशी आणि नाकावरची आरशी जवळजवळ जोडीजोडीनेच आली.

त्यानंतर आयुष्यात अनेक चष्मे आणि चष्मेवाले, स्वयंवरातल्या 'बहुत नृपति ते', सारखे आले गेले! काही हरवले, काही फुटले काहींनी काडीमोड केली. काहींचे पूल मोडले पण शेवटचा चष्मा फुटला. त्याचे फुटणे मात्र जरा निराळे.

मी दोन चष्मे वापरतो. दोन्ही नवंबराचेच, पण एक उन्हाचा आणि दुसरा सावलीचा. रस्त्यात काळा चष्मा आणि घरात गोरा! काळा चष्मा लावून चाललो होतो. आणि समोरून एक साहित्यिक मित्र आला. त्याने काही कारण नसताना मिठी मारली आणि ती मिठी कोणाच्या तरी खिशात कडकडली. पापड मोडावा, तसा चष्मा काचाकांड्यासकट मोडला. ह्या माझ्या साहित्यिक मित्राला उगीचच मिठ्या मारायची सवय आहे. त्याची एरवीची मिठी मला दोन द चहा, खारी बिस्किटे आणि एक सिगरेटचे पाकीट - माचिसह - एवढ्याला पडते. पण आजची मिठी सेल्स टॅक्स वगळून जवळजवळ चौतिस रुपयांना पडणार होती.

तसा काळ्या काचांचा चष्मा शिल्लक होता. परंतु दिवसभर काळा चष्मा लावून घरातदेखील वावरायला मी काही सिनेमातला हिरो, डिटेक्टिव्ह किंवा खुनी नव्हतो. ही मंडळी सदैव डोळ्यांना काळा चष्मा लावतात. त्यामुळे चोराला आपण डिटेक्टिव्ह आहोत, असे भासविता येते.
तात्पर्य, शक्य तितक्या लवकर नवा चष्मा होणे प्राप्त होते. मी अन्नाशिवाय दिवस काढले आहेत, पण चष्म्याशिवाय एक तास काढणे अवघड

(फार भूक लागली की हे विधानं मी उलटे करतो - खोटे का बोला ?)
सकाळी जाग आल्यावर डोळ्यांवर चष्मा चढला नाही, तर दिवस फुटल्याचे कळत नाही. शोडकशाल चष्मा फुटल्यावर नशीब फुटल्यावर काय होत असावे याची अंधुक कल्पना येते.

चाळशी आली, काही वर्षांनी कळली येणार. जवळचे दिसले ते दूरचे नाही. दूरचे दिसले तर जवळचे धूसरले, अशी अवस्था झाली. माझ्या डोक्यावर 'कृतांत कटकामलध्वजा' चे तिशीतच झेंडावंदन झाले होते. पण चाळशीने मला जरा अधिक धक्का दिला. एक वेळ दोन बायका संभाळता येतील. काही वीरपुरुषांनी त्या संभाळल्या आहेत. याला इतिहास आणि वर्तमान साक्ष आहे. पण दोन चष्मे संभाळणे अत्यंत बिकट! मनाच्या इतऱ्या औदार्याचा साक्षात्कार चाळिशीतच होतो., आणि म्हणूनच कदाचित प्रशमच चाळीशी चढलेल्या त्या कुण्या द्रष्टजाने म्हटले असेल की आयुष्याची सरवात चाळिशीत होते. न्याय- अन्याय, मान- अपमान, प्रेमभंग आणि प्रेमपूर्ती, निर्धनता आणि सधनता हे सारे भोग भोगून चाळी चाळिशीतला माणूस, असं म्हणतो, ह्या खेळाचे नियम हे आहेत होय ? आलं लक्षात. आता मांडा सारीपाट!

हा रस्ता अनामिकच राहिला. कुणी-कुणी त्याला 'स्टेशन रोड' म्हणायचे पण 'स्टेशन रोड' हे काय रस्त्याचे नाव झाले, तर आमच्या गावचे जवळजवळ सगळेच रस्ते स्टेशन रोडच होते. "सर्वदेव-नमस्कार केशवं प्रति गच्छति" ह्या न्यायाने लहान-मोठ्या सगळ्या रस्त्यांची ओढ स्टेशनकडेच होती. पण काळ्याकिरट्या पोरांनादेखील राजेंद्र, रवींद्र, गिरीश, शिरिष अशी नावे ठेवतील. आणि प्रल्हाद गोरापान राजबिंडा नुसताच 'बाबू' ह्या सामान्यनामाने ओळखला जावा. तशी आमच्या रस्त्याची अवस्था होती. त्याला कोणी चांगलेसे नावदेखील दिले नाही. गावातले विजेच्या दिव्यांचे खांब पुढे उखडल्यावर शिल्लक राहिलेले दोन-चार खांब ह्या रस्त्याच्या वाट्याला आले. खडी-डांबराचा स्पर्श तर त्याला कधीच मिळाला नाही. निदान मी गाव सोडीपर्यंत तरी नाही मिळाला. पण माझा हा रस्ता कधी दीनवाणा वाटला नाही. मोठा वैराग्यशील रस्ता! पावसा-पाण्यातदेखील त्याचे गांभीर्य नष्ट होत नसे. उन्हाळ्यात तो कधी तहानलेला वाटला नाही. आणि थंडीत आखडला नाही. हरेश्वराच्या गुहेत एक साधू बसत असे. आमचा रस्ता मला त्या साधूसारखा वाटायचा. गुहेतले बाकीचे साधू वाचाळपणा करायचे, चिडा-ओरडायचे; पण हा साधू अगदीच शांत असे. आम्ही मुले बाकीच्या साधूंपुढे खूप माकडचेष्टा करीत असू, पण ह्या साधूला मनोभावे दंडवत घालत होतो. आम्ही ते गाव सोडून जाताना मी माझ्या त्या रस्त्याला हळूच दंडवत घालून आलो होतो. इतक्या वर्षांनी ही गोष्ट जाहीर करतानादेखील मला उगीचच लाजल्यासारखे होते. काहीही असो, माझा तो गंभीर, वैराग्यशाली, अनामिक रस्ता माझ्या मनात पक्का जाऊन बसला आहे, हे खरे!

त्यानंतर आयुष्यात खूप वाटा तुडवल्या. अनेक रस्ते ओळखीचे झाले. पण कुणाशी उभे राहून बोलावेसे वाटले नाही. काही रस्ते चावट असतात. वळतात काय, पळतात काय! माझा हा रस्ता सरळ होता. पण केवळ सरळ होता म्हणून मला आवडत होता, असेही नाही. सगळीच सरळ माणसे आपल्याला कुठे आवडतात...???

## रस्ते

रस्त्यात स्वतःशीच बोलण्याची सवय पुष्कळांना असते पण. लहानपणी मी रस्त्याशी बोलत असे. आमच्या घरापासून स्टेशनापर्यंत एक आपला उभ्याच्या उभा रस्ता पसरला होता. गावात वस्तीही त्या वेळी बेताचीच होती. त्यामुळे सकाळ- संध्याकाळ गाड्यांच्या ठराविक वेळा सोडून तो बहुधा रिकामाच पडलेला असायचा. आमच्या लहानशा घरापुढे उगम पावून तो स्टेशनाला मिळत असे. आमच्या घराजवळ त्या रस्त्याचे गोल डोळे होते, आणि त्याच्या पलीकडे एक अनेक वर्षे पडलेला मातीचा ढिगारा होता. छोट्याशा टेकडीसारखा. उशीवर डोके ठेवून पडलेल्या माणसासारखा हा रस्ता पडलेला होता. त्याच्या दुतर्फा उंच वृक्ष चवऱ्या ढाळीत नव्हते आणि हवेल्या दासीसारख्या उभ्या ही नव्हत्या. त्या मानाने गावातले इतर रस्ते अधिक कर्तेसवरते होते. हा साधासा कि निर्बलच रस्ता होता. बराचसा थकलाभागलेला. मला त्याची दया यायची.


शाळा सुटल्यावर बाकीची मुले आपापल्या रस्त्याला लागत आणि मी एकटा या रस्त्याने परतत असे. त्या वेळी त्याचे- माझे बोलणे चालायचे. काय बोलत होतो ते आता आठवत नाही; पण बोलत होतो हे निश्चित. कदाचित वर्गातल्या दुष्ट पोरांची आणि त्याहून दुष्ट मास्तरांची गाऱ्हाणी मी त्याला सांगत होतो. असे मला वाटते. गाव वसवणाऱ्या माणसाने वास्तविक त्या रस्त्याला महत्त्व देऊन वसवले होते. पण पुढारीपणालाही भाग्य लागते. इतर रस्त्यांचे आणि घरांचे काय कट, झाले, होते पण पुढारी- पणालाही भाग्य लागते. देव जाणे! त्या रस्त्यांनी आपल्या गटातून ह्याला उडवला आणि गावाच्या मध्यभागी यायचा हा रस्ता बाजूला पडला. आमच्या चिमुकल्या स्टेशनवजा घराची आणि लगतच्या चारदोन गरीब झोपड्यांची सोबत सोडली, तर त्याला जवळचे असे कुणी नव्हते. इतकेच नाही, तर त्याच्या मागून आलेल्या लहानसहान रस्त्यांनादेखील मोठमोठी नावे होती, पण

मला एकच समाधान आहे. हे जे काही केलं त्यातून कुणाच्या तरी जीवनामध्ये थोडाफार आनंद निर्माण करू शकलो.

माझं गणगोत खूप आहे. ऐलतीरावरचं पाहाण्यासारखं इतकं आहे की पैलतीराची चिंता मी कशाला करायची ? माझी मैफिल चालूच आहे.

– पु. ल. देशपांडे

# पु. ल. देशपांडे



# बंगाल व शांतिनिकेतन

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# पु. ल. देशपांडे यांची बंगालची सफर

मी बंगाली भाषा शिकणार असल्याची खबर, मला बंगालीचे ओ की ठो माहित होण्यापूर्वीच थेट नक्षलवाडीपर्यंत गेली असेल. दोष लोकांचा नाही माझाच! माझ्या पोटातले मला कळण्याआधीच ओठांत खुळखुळायला लागते. काही माणसे कशी बाजारातून साधी लसूण आणायला निघाली तरी आपला जाण्याचा हेतू क्रांतिकारासारखा गुप्त ठेवतात. आम्ही लसूण आणण्याआधीच संध्याकाळी पिठलं भात असल्याचा बेत जाहिर करून मोकळे. काहीही चांगलं सुचलं की ते कुणाला तरी सांगून टाकायचे मला हौस सुटते. बंगाली भाषा शिकण्याच हे असचं झालं.

मला बंगालीची भूक का लागली हे मात्र सांगता येणं शक्य नाही. ही भाषा भोगण्यापलीकडे माझा कोणताही हेतू नव्हता. टागोर आणि शरदबाबू काय पण साध्या बंगाली दुकानदारासारखेही बोलता येणार नाही. हे काय मला कळत नाही. पण संगीताइतकाच 'भाषा' हा मानवनिर्मित चमत्कार मला फार आवडतो. शब्द वाक्यात बसायला आतडते, मग ते विदग्धांचे असोत की जानपदांचे. मराठी शिकणाऱ्या माझ्या इंग्रज स्नेह्याने मला 'खरकटे' ह्याचे भाषांतर विचारले होते. मी अजून शोधतो आहे. भाषाभाषांच्या नाना लहरी हे सारे ठाऊक असूनही मी बंगालीशी दोस्ती जमवायला निघालो होतो. हेतू शोधायचाच तर कदाचित एवढे म्हणता येईल की, पंचविशीत मराठीतून आणि इंग्रजीतून वाचलेले रवीन्द्रनाथ आणि शरदबाबू मूळ बंगालीतून वाचण्याची जुनी ओढ पन्नासाव्या वर्षी पुन्हा प्रकटली.

माणसाला कसली ओढ केव्हा अस्वस्थ करील हे सांगणे अशक्य आहे. पूर्वजन्मी माझा आत्मा कुठल्या कुडीत बिऱ्हाड थाटून होता हे जसे मला ठाऊक नाही तसेच पुढच्या जन्मी त्याची सोय

कुठल्या देहात होणार आहे. हे ही जाणण्याची मला इच्छा नाही. तरीही इतक्या उशिरा बंगाली 'गम भ न' करायचे म्हणजे वयाच्या हाडशोळाच्या काठावर पन्नासवरून पुन्हा एकदा शिशुवर्गात आणायचा होता. बरे वय म्हणजे काही केवळ कॅलेंडरची तीनशेपासष्ट गुणिले पन्नास ही पाने नव्हेत असंख्य संस्कारांची ओझी पाठीवर साहित्य नाट्य इत्यादी क्षेत्रात 'कल्चर' लागलेला मी एक पब्लिक माणूस! नाही म्हटले तरी एका रद्दीवाल्याच्या वर्षभर चरितार्थ चालावा इतका छापील कागदी वजनाचा मी लेखक आहे.

मी बंगाली शिकायचा यापूर्वीही प्रयत्न केला होता. कामशेतला होसबाबू म्हणून माझे स्नेही राहतात. पण हे म्हणजे पिकनिक मध्ये पोरांच्या बरोबर गमतीने क्रिकेटची मॅच खेळल्या सारखे होते. मी पूर्णपणे विद्यार्थी होऊन विद्या करीत नव्हतो. ह्या खेपेला मात्र जोरदार निश्चय केला. आणि गेली बारा-चौदा वर्षे कलकत्त्यात राहणाऱ्या श्री. वा. जोशी ह्या माझ्या रवींद्रप्रेमी स्नेह्याला एक खुले खलिता पाठवला. कलकत्त्यातल्या साऱ्या बंगाली जाळपोळीत राहूनही 'अवश्य या' असे सांगणारा हा पहिला भिडू निघाला. मग मी शांतिनिकेतनला मुक्काम ठोकायचा बेत पक्का केला. दगडफेक, ॲसिडबल्ब, आगी लावणे वगैरे चढाओढीत प्रत्यक्ष नव्हे तर प्रेक्षक म्हणूनही मला भाग घ्यायचा नव्हता. शिवाय डेकयाला स्टीक पाडून होऊन त्यावरून बंगाली मुळाक्षरे आत घुसवायची माझी इच्छा नव्हती. गाडी सुटली गाडी हलता-हलता माझ्या पत्नीने सलीलला सांगितलं,

"यांगला कडक बंगाली मास्तर पकडून त्यांच्या ताब्यात द्या" उनाड विद्यार्थ्यांना बोर्डिंगात घालायला नेतात तसे सलील आणि त्याची पत्नी शार्लट मला शांतिनिकेतनात घालायला घेऊन निघाले.

एका वर्तमानपत्रवाल्यापुढे सलील वर्तमानपत्रे घ्यायला थांबला. तिथे दोन-चार लोक फुकट वर्तमानपत्रे वाचीत बसले होते. हा देखील आस्तिक भारतीय गुण आहे हे पाहून बरे वाटले, त्यातल्या एका माणसाने सलीलकडे पाहून. "तुम्ही बंगाली की

आणखी कुठले? असा प्रश्न विचारला. सलीलला पाहताच त्याने त्याच्याकडे पाहून तुम्ही अंदमानात होता का असा प्रश्न विचारला. हा टोमणा सलीलच्या चित्रविचित्र वेषभूषेला आणि भरघोस केशसंभाराला उद्देशून होता. बंगालची विनोदबुद्धी इतकी कोकणी बळवाची असेल याची मला कल्पना नव्हती.

सकाळचे दहा वाजून गेले होते. शहर अजूनही डोळे चोळतच होते. स्टेशनाबाहेर सायकल-रिक्षेवाले होते. त्याव्यतिरिक्त दुसरे वाहन नव्हते. सायकल-रिक्षात बसणे माझ्या अगदी जिवावर येते. चणेकुरमुरे आणि हातभट्टीची दारू या खुराकावर जगणारे ते रिक्षावाले. थंडी, वारा, ऊन, पाऊस कसलीही शिस्त न मानणारी रहदारी आणि रस्त्यातले खाचखळगे ह्या अडचणीतून आम्हां बाबूंना ईप्सित नेत असतात. असाच एका सायकल-रिक्षातून आमच्या स्वाऱ्या निघाल्या.

बंगालात आपण राजकीय चर्चेच्या भानगडीत पडायचे नाही. असे मनाशी किती ठरवले तरी क्षणाक्षणाला अशी भयंकर दृश्ये दिसतात. अशा भयंकर बातम्या वाचायला मिळतात की ह्या ज्वालांचे चटके बसल्यावाचून राहत नाहित. माझ्या आयुष्यात मी कधी पाहिल्या नसतील इतक्या राजकीय मिरवणुका आणि सशस्त्र लोकांचे मोर्चे मी बंगालच्या माझ्या तीन महिन्यांच्या वास्तव्यात पाहिले. हॉटेलात, बसच्या थांब्यावर, दुकानात जिथे जावे तिथे राजकारणाची वटवट. त्यातून संताप भांडणे व जाळपोळ क्रांतीची ज्वाळा भडकवायची म्हणजे दुग्धवाटप-केन्द्र जाळायची बसेस आगगाड्या, इथपासून ते शाळा आणि वाचनालयापर्यंत जे दिसेल ते जाळायचे एकदा सारे काही जाळू या. मग पुढचे-पुढे पाहता येईल हाच फक्त विचार मोर्चा यशस्वी होणे म्हणजेच हाक देणारे पुढारी सोडून इतरांपैकी कुणाचा तरी गोळीबारात मृत्यू. लहानसहान दुकानांची जाळपोळ मग बस-ट्राम वगैरेचे दहन

साडेबाराच्या सुमाराला स्टेशनात परतलो. रेल्वे रेस्टॉरंटमधले जेवण मागवून ते येण्याची वाट पाहत होतो. तेवढ्यात शांतिनिकेतनच्या

दिशेने आलेल्या गाडीतून सलीलच्या हाकेला भाऊ मंटू आणि त्यांचे दुसरे स्नेही पूर्णानन्द बाबू चतर्जी हे रेस्टॉरंटमध्ये आले. उंच सडपातळ बांध्याचे थाळीशी पलीकडले मंटू बाबू उत्तम खेळाडू असले पाहिजेत. हे प्रथमदर्शनीच ध्यानात आले. पूर्णानन्द बाबू मात्र स्थूल, ठेंगणेसेकडे, उजळ वर्णाचे, बंगाली चाळचे बैठ्या प्रकृतीचे गृहस्थ पहिल्या भेटीत दोस्ती जमाती असे. मंटू बाबू विश्वभारतीत वॉच अँण्ड वॉर्ड विभाग संभाळतात. शांतिनिकेतनात वॉच अँण्ड वॉर्ड आहे हे ऐकून मला सौम्यसा धक्काच बसला. पूर्णानन्द बाबू शांतिनिकेतनातल्या हायस्कूलमध्ये शिक्षक आहेत. गोल गुबगुबीत पूर्णानन्दबाबूंना 'लेंबू-दा' म्हणतात. 'लेंबू-दा' म्हणजे लिंबूदादा लिंबासारखी कांती आणि गोलाई असलेल्या पूर्णानंदांना हे नाव शोभतेही बंगाल्यांना एक पाळण्यातले नाव असते. तर हाक मारण्याचे एक डाकनाम असते. डाक म्हणजे हाक! पोस्टमन पूर्वी नाव पुकारून पत्र टाकीत म्हणून पोस्टाचीही 'डाक' झाली असावी. आपल्याकडे आपण आपल्या नावाची तोडमोड करून हाक-नाव तयार करतो. बळवंताला बाळ, सदाशिवाचा सदू वगैरे पूर्णानन्दबाबूंच्या घरात तर मुलांची डाकनामे भाजीपाल्याची आहेत. पूर्णानन्द लेंबू तर त्यांचा भाऊ 'आलू' म्हणजे बटाटा आणि बहिण 'कोपी' म्हणजे कोबी. चित्रा, नंदिता, सुजाता, अमिता, कल्पना असल्या सुंदर नावाच्या पोरींना टुकी, खुकी, चुलबुली, टुनटुना, भोंदूळ अशा डाकनामांनी हाक मारलेली ऐकताना चमत्कारिक वाटायचे. पण ह्या डाकनामांची इतकी सवय झाली आहे की पूर्णानंदबाबूंचे विद्यार्थी-विद्यार्थीनी देखील त्यांना लेंबू-दाच म्हणतात. माझे डाकनाम काय आहे हे विचारल्यावर मी पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे असे सांगून एका बंगाल्याला भोवळ आणली होती.

बंगाली नावाची आणखी एक मजा आहे. बंगालीतून लिहिताना चतर्जी- मुखर्जी असे नाही लिहित. लिहिते सगळे चट्टोपाध्याय मुखोपाध्याय होतात पण इंग्रजीतून मात्र नेच

चट्टोपाध्याय चॅटर्जी होतात. आपले ठाकूर मराठी इंग्रजीत ठाक्रस्य पण बंगाली ठाकूर इंग्रजीतून टागोर! बंगाली बसू, इंग्रजीत बोस एकदा लेखी एक आणि उच्चारी दुसरे. म्हणजे 'बसू' लिहिले तरी म्हणायचे 'बोशू'! स श ष च्या महान घोटाळा

शांतिनिकेतनात आज एक मोठा सुंदर समारंभ पाहिला. सलील मला म्हणाला, "सायंकाळी मंदिरात रवीन्द्रांची स्नुषा प्रतिमादेवी यांचे पहिले वर्षश्राद्ध आहे. आपण जाऊ या" प्रतिमादेवी ह्या रवीन्द्रनाथांचे चिरंजीव रथीन्द्रनाथ ह्यांच्या पत्नी पोटची पोर करील अशी ह्या सुनेने आपल्या सासऱ्याची सेवा केली होती. रवीन्द्रांचा विश्वसंसार जरी विशाल असला तरी कौटुंबिक जीवनात ते एकले होते. १९०२ साली म्हणजेच वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी रवीन्द्रांच्या पत्नी मृणालिनीदेवी वारल्या रवीन्द्रनाथ त्या वेळी एकेचाळीस वर्षांचे रथीन्द्र चौदा वर्षांचा मीराचं वय दहा, धाकटा शमीन्द्र आठ वर्षांचा होता. पण रथी, मीरा आणि शमी ह्यांचे संगोपन करायची जबाबदारी गुरुदेवांच्यावर होती. पत्नीच्या निधनानंतर अवघ्या दहा महिन्यांनी 'राणी' चे निधन झाले.

रवीन्द्रांनी जीवनातले प्रत्येक कर्म कमालीच्या निष्ठेने केले. ते कवी होते. थोर कलावंत होते. पण त्यांच्या जोडीला आदर्श गृहस्थाश्रमी होते. नियतीने सूड काढावा तसे गृहस्थाश्रमातले सारे आघात त्यांना सोसायला लागले पण त्या आघातांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनावर त्यांनी मळभ होऊ दिले नाही. सूर्यकिरणांनी ढगांचे काळे पडदे फाडून बाहेर यावं तसे रवीन्द्रही आपल्या प्रतिभेच्या तेजाने ही दुःखे फोडून बाहेर पडत. प्रत्येक कार्याची जणू त्यांनी ज्योत हाती धरली होती. चित्तावर वैयक्तिक दुःखाचे मालिन्य येऊ द्यायचे नाही. काजळी काढू द्यायची नाही. या निर्धाराने हा कवी जगला. रथीन्द्रांखेरीज त्यांची सारी अपत्ये त्यांच्या डोळ्यादेखत गेली. पत्नी गेली. मुली वारल्या. वयाच्या बारा-तेराव्या वर्षी कॉलऱ्याने त्यांचा अत्यंत लाडका मुलगा शमी

निधन पावला. आमी हे तर रवीन्द्रांचेच बोलस्वरूप होते. घरातल्या महराम वर्गीय कारकूनाने पत्नी वारल्यावर मुलाबाळांचे आपल्या हाती करावे. तसे रवीन्द्रांनी केले. आजारी मुलींना मांडीवर घेवून ते रात्र-रात्र जागले. मनाचे जसे काय त्यांनी निरनिराळे लोखंडी कप्पे करून ठेवले होते. इकडल्या कशाची तिकडे दाद नाही. कौटुंबिक जीवनात वळवणीचे पाणी सतत आढळत गेले. त्या दुःखाचे डोंगर छातीवर घेवून हा महामानव गीते गात होता. लोकांना गाण्याला लावीत होता. नाटके बसवीत होता. ती अपेक्षेप्रमाणे उतरली नाहीत. तर पुन्हा-पुन्हा त्यात बदल करीत नाहीत. त्यांना निरनिराळी चाली देत होता. कथा लिहित होता. सामाजिक राजकीय चळवळीत भाग घेत होता. आम्रवृक्षांचे वाढदिवस साजरे करीत होता. डॉक्टर होऊन आजाऱ्यांना औषध देत होता. पायात घुंगरू बांधून नाचत होता. जणू काही वैयक्तिक जीवनात जे जे घडत होते. त्याच्याकडे 'कौतुक तू पाहे संचिताचे' म्हणत सामाजिक जीवनात आनंद वाटण्याची जबाबदारी नियतीने आपल्यावर टाकली आहे. अशा भावनेने जगत होता. क्वचित प्रसंगी एखादी व्यक्तिगत दुःखाची वेदना कवीलेख्या रूपाने प्रकटलेही असे. आपल्या एकाकी जीवनाविषयी त्यांनी एका कवितेत म्हटले आहे.

" हरा दाराला मुकलेला
असा मला वाटेवरचा एकटा वाटसरू केलेस,
बोई भालो, ओगो बोई भालो
तेचि भले गा तेचि भले. "

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः म्हणजे तरी दुसरे काय असल्या या भवती प्रचंड गलबला असूनही एकला असणाऱ्या रवीन्द्रांच्या जीवनात त्यांच्या धाकटल्या एक सुनेच्या प्रतिमादेवीच्या त्यांना आधार लाभला. प्रतिमा बालविधवा होती. गुरुदेवांनी रथीन्द्रांशी त्याचा पुनर्विवाह केला. तत्कालीन वंग समाजातल्या पुनर्विवाह वगैरे मान्य नव्हते. त्यामुळे सनातनी हिंदूंचे शिव्याशाप

राबे लागले. एकोणिसशे दहा झाली. छोटी प्रतिमा रवीन्द्रांची सुनबाई होऊन शांतिनिकेतनात आली. एकोणसाठ वर्षे तिने प्रपंचाचा भार सांभाळला. एकूणसत्तर साली नऊ जानेवारीला तिचे निधन झाले. मागे पुत्रसंतान नव्हते. परंतु वर्षश्राद्धाच्या इतका गंभीर आणि असुंदराचा कसलाही स्पर्श नसलेला तिथी पुत्रवंतांच्याही नशिबात नसेल.

संध्याकाळचा तो समारंभ संपला त्यावेळी दिवेलागण झाली. आश्रमातल्या मुलांची आई होऊन राहिलेल्या अपत्यहीन प्रतिमादींच्या आठवणी एकमेकांना सांगत माणसे तिथेच रेंगाळत होती.

कलकत्त्यात माणसे होशातल असतात. गर्दी नाही असे ठिकाण नाही. त्यामुळे कालीच्या देवळात गेले की बोकडांच्या मुंड्या मुरगळणाऱ्या माणसांची भयंकर गर्दी - मैदानात पहावे तर कम्युनिस्टांच्या प्रचारसभेची गर्दी - बेलूर मठात रामकृष्णांच्या भक्तांची गर्दी - फुटबॉल मैदानावर तरुणांची गर्दी - श्रीमंतांचे क्लब्ज भरलेले नाइट क्लब्ज जॅम् सेशन्स तुफान - गटारे फुटून वाहती तसे भणंगांचे मोर्चे फुटून वाहतात. त्यांना छेद देऊन दागिन्यांनी लदलेल्या मारवाडी बायकांची लग्नाची मिरवणूक जाते. मी तर कलकत्ता म्हटले की स्तब्ध होतो. काही लोक त्याला जैन्रा म्हणतात. मला तर त्या शहराला तापात होतो तसा वात झाल्यासारखे वाटते. कोणीतरी कोणावर तरी खवळूनच उठलेला असतो. एकतर ह्या भाषेलाच अतिशयोक्तीचा शौक फार! मराठी लोक जितके शब्दांबाबत कंजूष तितके हे बंगाली 'उदार' हे ठायी ठायी पटत होते. प्रत्यक्षात काय वाटेल ते घडो, त्यांचा रिपोर्टिंग म्हणजे सनसनाटी हवी. 'सारा मोहल्ला भस्मसात' म्हणजे एखाद्या हाराच्या दोन सिंडकरांना आग! मोर्च्यातून घोषणा देत जाणारे मुंबई-पुण्यात बरेच लोक पाहिले आहेत. पण बंगाली मोर्च्यात लोक अंगात आल्यासारख्या घोषणा देत असतात. आपली 'झालाच पाहिजे' ची घोषणा देखील बंगाल्यांच्या 'चोलबेना-चोलबेना' पुढे भलतीच लाडिवाळ वाटेल. कलकत्त्यातल्या प्रेत-यात्रेतले 'हरी बोल' (उच्चार 'होरी-बोल') देखील 'राम बोलो' पेक्षा खूपच जिवंत प्रेतयात्रासुद्धा आवेशात जात असतात.

मुंबईला परतण्याच्या आदल्या दिवशी सकाळी वृक्षाच्या चबुतऱ्यापाशी गेलो. सहा साडेसहा वाजले होते. पण अंधार झाला होता. आणि रस्त्यात चिटपाखरू नव्हते. त्या चबुतऱ्यावर ट्यूबचा झगझगीत प्रकाश पडला होता.

आणि एखादा चित्रपट दिग्दर्शकाने भयाण इफेक्ट साधण्यासाठी आणून बसवावे तसे एक घुबड त्या चबुतऱ्यावर येऊन बसले होते. माझा शकुन - अशकुनावर विश्वास नाही. परंतु बाहेर पडताना मांजर आडवे गेले तर कुत्रे आडवे गेले अशी ती घटना मी झटकून टाकू शकलो नाही. चार पक्ष्यांसारखाच तो ही एक पक्षी त्याला हिंदू लोकांनी अशुभ म्हणून निर्माण केले. टागोरांचीच एक कविता आहे. त्यांत आंबा म्हणतो 'माकोलभैय्या '(माकोल हे एक उग्र वासाचे पण बाहेरून दिसायला सुंदर असे फळ आहे) माकोलभैय्या आपल्या दुनियेत आपण सगळे सारखे होतो. हा माणूस नावाचा प्राणी आपली कृती होऊन आला आणि त्याने आपल्या दुनियेत हा 'मूल्यभेद' सुरू केला."

माणसाने 'मूल्यभेद' फळाफुलांच्याच नव्हे तर स्वतःच्या दुनियेतही भरपूर केला आहे. विश्वभारतीप्रमाणेच कलकत्त्याला रवीन्द्रभारती नावाचे विद्यापीठ आहे. तिथल्या दीक्षान्त समारंभाच्या वेळी एका स्नातकाने पदवीपत्र घेतले. आणि तिथल्या तिथे सगळ्यांच्या देखत फाडून टाकले.

" हा कागद मला काय कामाचा? मला चाकरी द्या?"
ही घोषणा केली रवीन्द्रनाथांनी स्नातकांच्या हाती सप्तपर्णीची पाने देण्याची घोषणा पद्धत सुरू केली. त्या प्रतीकामागे कल्पना होती ती अध्ययन आणि अध्यापन ही जीवनाची नित्य साधना मानण्याची जेव्हा अध्ययन आणि अध्यापन ही साधना न होता. चाकरीचे साधन होते. त्यावेळी त्या प्रतीकालाही अर्थ उरत नाही.
' मानली तर बागशाही नाहीतर कोण्या झाडाचा पाला!"
असे गडकऱ्यांनी म्हणून ठेवलेच आहे. ज्ञानाची तळमळ नसताना शंभरातले पस्तीस गुण मिळवून उरलेले पासष्ट टक्के अज्ञान

चालू देशाच्या विद्यापिठातली साधनाच संपली आहे म्हणून पदवीचे पण हा मुला कागदाचा कपटा होऊन जातो. आंधळ्या परंपरेने कूप असून त्यालाला गाळ फेकून द्या. हे सांगणाचे धैर्य असलेले ईश्वरचंद्र विद्यासागर किंवा रवीन्द्रनाथ हे आहिश पण पश्चकार असे बोलायला मील नव्हते. आज ती होळी पल्कदन नव्या काळाने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधायला निर्धाराने पुढे सरसावणारे नेतृत्वच मुळी विश्वभारतीत नाही. सगळीकडून अंधारून आले आहे.

बंगालात सध्या नक्षलकांड चालू आहे. त्या काळात लिहिलेला हा उपसंहार आहे. हे कांड संपावे आणि नव्या सुंदर जीवनाच्या उपोदघात व्हावा हे बंगाली लोकांप्रमाणेच मलाही वाटले. माझ्या आयुष्यात लाभलेली सुंदर अनुभवाची मोरपिसे मी आजही पुस्तकाच्या शाळकरी मुलाच्या उत्साहाने जपून ठेवली. बंगालात तर मला गोड अनुभवांची खूपच मोरपिसे गवसली. आयुष्याच्या ग्रंथातही उपसंहारातल्या दिशेला नेणारी पाने उलटताना. तसली आणखी सुंदर पिसे जमवून ठेवायची मला उमेद आहे. आणि म्हणूनच बंगालवर प्रथमदर्शनातच जडलेले प्रेम द्वितीय दर्शनात मिळालेल्या काहीशा निराशाजनक अनुभवांनतरही तितकेच टिकून आहे. आणि म्हणूनच 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा!' हे गीत ज्या उत्साहाने मी गातो. त्याच उत्साहाने मी वंगपुत्र आणि वंगकन्यांच्या सुरात सुर मिळवून म्हणेन की

' आमार शोनार बांगला तोमाय भालोबाशी श्रीते!

मी ॲंग्री यंग मॅन नाही मी हंग्री यंग मॅन आहे.

मला सर्व भाषांमधलं सगळं समजायला हवं आहे. केशवसुतांनी म्हटलंय तसं खादाड असे माझी भूक चेतकोशने मला न सुख

— पु. ल. देशपांडे

# पुलंचे निवडक नाट्यवाङ्मय.



Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# " तुका म्हणे आता "

- पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे.

ज्ञानियांच्या राजापासून सानेगुरुजीपर्यंतच्या मराठी साहित्यिकांच्या परंपरेतल्या साहित्यिक आणि संतांची श्रद्धावंत आणि बुद्धिवंतांची मस्तके, ज्या कल्पनेपुढे आदराने नमली त्या " पुंडलिकाच्या भेटीसाठी अठ्ठावीस युगें विटेवर तिष्ठत असलेला पंढरीच्या पांडुरंग," ह्या दिव्य कल्पनेस अर्पण.

"तुका म्हणे आता" ह्या नाटकाचा प्रथम प्रयोग ता. ८ नोव्हेंबर १९४८ रोजी रात्रौ ९ वाजता पुणे येथील भानुविलास नाटकगृहात मंगल नाट्यमंदिर या संस्थेतर्फे झाला.

या नाटकात भूमिका करणाऱ्या नटनटींची नावे :-

| | |
|---|---|
| दिग्दर्शक | श्री. पु.ल. देशपांडे |
| संगीत दिग्दर्शक | श्री. वसंत देशपांडे |
| तुकाराम | शांताराम पाटील |
| सेनू तेली | वसंत देशपांडे |
| ग्यानबा चांभार | वसंत शिंदे |
| जिजाई | शकुंतला जाधव |
| संबाजी | धुमाळ |
| पिऱ्या रामोशी | बाबुराव घोटकर |
| शिवाजी | वसन्त सबनीस |
| जानकी | सरोज बोरकर |
| रामेश्वरशास्त्री | गोपाळ बकरे |
| सिद्धेश्वरशास्त्री | श्रीपाद जोशी |

रामनायकाचार्य : केशव जोशी
सहाय्यक : श्री . रामदासी
तबला , मृदंग : श्री . मधु तिसगांवकर
रंगभूमी सजावट : श्री . एम . डी . कुलकर्णी व बापू पवार .

# अंक पहिला

नाटकाच्या सुरुवातीलाच मंगलाचरण सुरु होते व ते संपल्यानंतर संत तुकाराम महाराज अभंग सांगत आहेत . आणि संतू नावाचा व्यक्ती ते अभंग लिहून घेत आहे .

"विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।
आईका जी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित सत्य करा
कोणाहि जीवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।

हा अभंग संत तुकाराम ऐकवतात व सर्व भक्त अभंग ऐकण्यात तल्लीन होतात . व संतू तेली एकीकडे अभंग लिहून घेतो . अभंग म्हणून झाल्यानंतर तुकाराम महाराज संतूला म्हणतात की मी हे वेडेवाकडे बोलतो ते तू ग्रंथात कशासाठी लिहून घेतोस ? संतू हा संत तुकाराम महाराजांचा भक्त आहे . त्याला अभंग लिहून ठेवण्यास चांगले वाटते . थोड्या वेळाने ग्यानबा नावाचा व्यक्ती येतो व तोही अभंग ऐकण्यात तल्लीन होतो . संत तुकाराम सांगतात की , "वैष्णवाचा धर्म हा जोडणाऱ्यांचा आहे . तोडणाऱ्यांचा नाही . " ग्यानबा संतूला

तुकाराम पुढील अभंग म्हणतात.
'सजन कसाया विकू लागे मांस । माळ्या सांवत्यास खुरपू लागे।
नरहरि सोनारा घडू फुंकू लागे । चोखामेळ्यासंगे ढोरे ओढी।
नामयाच्या जनीसवे वेची शेणी । धर्मा घरी पाणी वाहे झाडी।
मीराबाईसाठी घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार
पुंडलीकासाठी अजून तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची।

अभंग होताच तुकाराम यांची पत्नी तेथे येते. तिचे नाव जिजा आहे. ह्या सर्व गोष्टी पाहून जिजा राग व्यक्त करते. संतू, ग्यानबा, तुकाराम यांना कामधंदे करा असा संदेश त्या देतात. जिजा तुकाराम महाराज यांना म्हणतात की घरात खायला दाणा नाही परंतु इथे अभंग म्हणायला वेळ आहे. आणि पोटापाण्याचं बघायला वेळ नाही. तसेच मंबाजीच्या मठात मुलांना जेवायला पाठवले आहे. हे संतू ऐकतो. व तो म्हणतो की मंबाजीच्या मनात काही विष घोळणारी गोष्ट चालत असेल. ग्यानबाही संतूच्या विचारांशी सहमत होतो. परंतु तुकाराम म्हणतात "चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती, व्याघ्र ही न खाती सर्प तया!" व जिजा (आवले) तुम्ही उगाचच मुलांना जेवायला पाठवलत तेवढ्यात जिजा म्हणते थाळ द्या. जरा दोन घास तुकाराम जिजांना समजावून सांगताना म्हणतात. "जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, उदास विचारे वेच करी." त्यानंतर मंबाजीबुवा येतात व म्हणतात. "सच्चिदानंद" आणि म्हणतात की, टाळाचा नाद ऐकून मी इथे पाराजवळ आलो. संतू अभंग लिहत आहे हे पाहून मंबाजी म्हणतात, कोणाचा ग्रंथ आहे? संतू उत्तर देतो की हा महाराजांचा ग्रंथ आहे. त्यात अभंग लिहून ठेवतो.

थोड्या वेळानंतर पिऱ्या रामोशी येतो आणि अभंग म्हणण्यास बसतो. टाळ घेऊन अभंगात सगळेजण दंग असतात परंतु संतूचे लक्ष त्या मंबाजीवरच असते. मंबाजी थोड्या वेळानंतर तुकाराम महाराजांवर काठीचा वार करण्यास जातो. तेवढ्यात संतू पाहतो आणि त्या मंबाजीचा गळा टाळांने धरतो. सगळेजण थांबतात. व मंबाजीच्या पोटात खरचं विष होते इथे फक्त तो देवाचे खोटे नाव घेऊन तो डाव साधण्यास आला होता. हे सर्वांना कळते. सर्वजण त्याला मारायला धावतात परंतु तुकाराम महाराज त्याला सोडून द्या अशी विनंती करतात. मंबाजी हा मनाने कपटी आहे हे सर्वांनाच माहित आहे. मंबाजी सर्वांसमोर तुकाराम महाराजांना म्हणतो "तुम्हाला वैकुंठाला पाठवतो."

भजनाला पुन्हा सुरुवात होते. मध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज' अशी ललकारी येते परंतु भजनात सगळे दंग असल्यामुळे शिवाजी महाराज प्रजेमध्ये जाऊन बसतात. भजन संपते व सर्वजण तुकारामांचे दर्शन घेतात. तुकाराम त्यांची गळाभेट घेतात व दोघेही बसतात. शिवाजीमहाराज जिजांसाठी काही अलंकार घेऊन येतात व ते त्यांना देतात. तर, तुकाराम यांची काही आवश्यकता नाही असे म्हणतात. परंतु आईच्या मायेसाठी ते हे करतात. शिवाजीमहाराज व तुकाराम यांच्यामध्ये संवाद सुरु होतो. तुकारामांजवळ असणारे वारकरी म्हणजेच संतु, ग्यानबा, रामोशी ह्या सर्वांचा शिवाजी महाराजांना परिचय करून दिला जातो.

हे ऐकून महाराजांना फार चांगले वाटते. शिवाजी महाराज निघतात. तेव्हा जिजा त्यांना गुळपाणी व शेंगदाणे देते. शिवाजी महाराज ते प्रसाद म्हणून त्यांच्यासोबत गडावर नेतात. जाताना शिवाजी महाराज व तुकाराम आलिंगन देतात.

## अंक दुसरा

ह्या अंकाच्या सुरूवातीलाच रामेश्वरशास्त्री वाघुलीकरांना व वाड्याचे दर्शन घडते. त्यांची पत्नी जानकी वाड्यात आनंदाने ओव्या म्हणत आहे. रामेश्वरशास्त्रीजींच्या वाड्यावर संतू येतो. जानकी त्याला विचारते तु कोण आहेस? तो म्हणतो आम्ही तुकाराम महाराजांच्या गटातली माणसं आहोत. रामेश्वरशास्त्रींच्या (घरी) वाड्यावर रामेश्वर शास्त्रीं हे तुकाराम महाराजांच्या न्यायनिवाडा करणार आहेत. त्यामुळे तुकाराम महाराजांच्या गटातलीं माणसं त्यांच्या वाड्यावर आली आहेत. परंतु जानकीच्या आनंद गगनात मावत नाही आहे. कारण संत तुकाराम महाराज त्यांच्या वाड्यावर येणार आहेत. त्या संपूर्ण वाड्याला रांगोळी, पंत्यांनी सजवत आहेत. काही वेळानंतर मंबाजी येतो. मंबाजीला ह्या सर्व गोष्टी पाहून फार राग येतो. मंबाजीच्या मते तुकाराम हे शुद्र आहेत तर त्यांच्यासाठी ब्राम्हणाच्या घरी एवढी तयारी कशासाठी करायची? मंबाजी रामेश्वर शास्त्रीला ह्या गोष्टी विचारतो. तर त्यावर रामेश्वरशास्त्री मंबाजींची समजूत काढतात. आणि जानकीसुद्धा त्यांची समजूत काढते. व तुकाराम महाराजांच्या स्वागतासाठी चर्चा तसेच तयारी करतात.

मंबाजीच्या मते तुकाराम शुद्र आहे आणि आपल्यासारख्या वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणाच्या घरात त्याचं पुढं स्वागत व्हावं हे आता मंबाजीला मान्य नसतं. त्यामुळे तो रामेश्वरशास्त्री व जानकी यांवर नाराज होतो. व वाड्याच्या वरच्या मजल्यावर जाऊन बसतो. त्यानंतर तुकाराम महाराज येतात. जानकी ओवाळते तेव्हा तुकाराम महाराज त्यांना ओवाळू देत नाही. तुकाराम महाराज म्हणतात, "इथला मी देहूचा एक शूद्र वाणी आहे महाराज. वेडवाकडं कांहीतरी गातो आणि देवाचं भजन करतो! हे ध्या पोथ्या हा माझा अपराध आहे. संतू तेली ने मी वेडेवाकडे अभंग म्हणालेले ह्यामध्ये लिहून ठेवले आहे." रामेश्वर म्हणतात "तुकोबा, मी इथं न्यायाधिश म्हणून आलो आहे. न्याय देवता मोठी निष्ठूर असते तिला मस्तक आहे- ह्रदय नाही." रामेश्वर शास्त्री आसनावर बसतात. व मंबाजी तेथून येतो. मंबाजी म्हणतात, "तुकाराम ह्यानं वैदिकधर्माविरूद्ध बंड आरलं आहे. पहिला अपराध संस्कृतांतली वेदविद्या ह्यानं प्राकृतांत सगळयांना सांगून भ्रष्ट केली." हा आरोप तुकारामांवर होतो. संतूला हे अमान्य आहे. परंतु मंबाजी संतू, गयानबा यांना सुद्धा आरोपी ठरवतो. रामेश्वरशास्त्री त्यांचेही नाव न्यायदानाच्या कक्षेत नोंदवतात. मंबाजी, रामनायकाचार्य, सिद्धेश्वर हे सर्व जण संत तुकाराम संतू गयानबा यांवर खूप आरोप करतात. वेदविद्या ही काय तेली तांबोळी आणि महार-चांभारासाठी आहे? आणि मग आम्ही ब्राह्मणांनी बारा-बारा वर्षे अध्ययन कशासाठी केलं? असे प्रश्न मंबाजी या सर्वांना विचारतो. त्यावर संतू त्याला अचूक उत्तर देतो. कारण हे जरी वेदग्रंथ वाचून मोठे ब्राम्हण झालेले असले तरी लोककल्याणा-साठी ते कधीच विचार करत नाहीत.

# अंक तिसरा

इंद्रायणीच्या काठचे देऊळ ह्या ठिकाणी पायरीवर तुकाराममहाराजांनी धरणं धरलं आहे. तुकाराममहाराज पायरीवर विठ्ठलाची आळवणी करीत आहेत. व त्यांच्यासोबत एकदोन वारकरी बसले आहेत. ग्यानबा त्यांना विनंती करीत आहे की तुम्ही हे धरणं सोडा चवदा दीस तुमच्या पोटात काहीच नाही. तुकाराम विठ्ठलाशी लढाई करायला तेथे बसले आहेत. ग्यानबा त्यांना म्हणतो की लढाई दुनयेवेगळी आहे तुकारामही त्याला याचा होकार देतात. ग्यानबा हा विठ्ठलांना दोष देत आहे. ग्यानबा म्हणतो चौदा दिवसानंतर तुम्ही डोळा उघडला आहे आता तरी धरणं सोडा. तुकाराम महाराज देवाचे दर्शन घेतात तेव्हा मधूनच मंबाजी येतात. त्यावरून ग्यानबा त्याला खूप बोलतो. मंबाजी संत तुकाराम यांना विठ्ठलाची भेट झाली का? असा प्रश्न विचारतात. ग्यानबाला खूप राग येतो. तो म्हणतो मंबाजी तुझ्या तोंडातले विष इथे ओतू नको पिच्या, ग्यानबा हे मंबाजीला मारण्याच्या तयारीत आहेत. परंतु तुकाराम हे धरणावर आहेत. मंबाजी हा शिवाजी महाराज हे तुकारामाला भेटायला आल्यामुळे त्यांचीसुद्धा थटा उडवत आहे. मंबाजीला संत तुकाराम ढोंग करत आहे असं वाटतं. त्यामुळे ते तुकाराम ह्यांना नको ते बोलतात. काही वेळानंतर जिजाई येथे येते मंबाजी तेथे असतो. त्याला ती खूप ओरडते. ती म्हणते चौदा दिवस झाले घरात चूल पेटली न्हाई मंबाजीला ह्या गोष्टीचे काहीच वाटत नाही. जिजाई तिच्या कुंकवाला धक्का लावू नको असे म्हणते. तुकाराम काहीच खात नसल्यामुळे जिजाई, पोरं, नातेवाईक फार मोठ्या संकटात आहेत. तिने देवीला नवस

केला आहे. त्यामुळे ती म्हणते उद्या आपल्याला देवीचा कऊल झालाय व अभंग धावणार आहे असे ती म्हणते. थोडं खाऊन घ्या. परंतु संत तुकाराम खात नाहीत. जिजाई त्यांना घरातील गोष्टी सांगते. मुला-मुलींची परिस्थिती कशी झाली आहे? ते तुम्हाला आळवीत आहेत. त्यांच्या संवादानंतर तेथे संतू, रामेश्वरशास्त्री जानकी तेथे ग्रंथ घेऊन येतात. अभंग लिहिलेले ग्रंथ पाहून तुकारामाच्या आनंद मनात मावत नाही. तो पांडुरंग यांना खूप धन्यवाद देतो. त्यांच्या वरच्या श्रद्धेला ते खूप मानतात. व देवाचे खूप आभार मानतात. त्यांना इंद्रायणी नदीने पुन्हा त्यांचे ग्रंथ परत केल्याने ते इंद्रायणी नदीचे देखील आभार मानतात. त्यानंतर त्यांना रामेश्वरशास्त्री व संतू ह्यामागचे सत्य सांगतात. की जानकीने जात्यावरच्या ओव्या ऐकल्या, संतूने शेतमळ्यांतून फिरून, रामेश्वर यांनी गृहस्थांच्या घरात जाऊन अभंग गोळा केले. अशाप्रकारे सगळीकडले अभंग ऐकून ते लिहून काढले ह्यामागे सगळे लोकश्रम आहे. ही अभंगगाथा नाही तर सक्षात अमृतकुंभ आहे असे जानकी म्हणते. तुकाराम जानकीचे आभार मानतात. तुमच्या दर्शनानं साक्षात इंद्रायणीचं पुण्यस्नान घडलं. पिऱ्या रामोशी हा मंबाजीला धरून आणतो व त्याला सांगतो की तुकारामांना मरण नाही व त्यांना सुद्धा मरण नाही. मंबाजी हा तुकारामांची माफी मागतो व त्यांचे नामस्मरण करतो. व त्यांचा उपवास सर्वजण सोडण्यास सांगतात. अशाप्रकारे संत तुकारामाचे सर्वजण दर्शन घेतात.

संकलन –
कु. दिपाली गायकवाड.

# बटाट्याची चाळ

'बटाट्याची चाळ' हे पुस्तक १९५८ साली प्रकाशित झाले. या पुस्तकाचे लेखन पु.ल देशपांडे यांनी केले. १९५० ते १९६० साली आपल्याकडे चाळ संस्कृती होती. आणि यातीलच ही एक 'बटाट्याची चाळ'। त्यांच्या नंतरच्या काळात आपण पाहिले की, नवनवीन ठिकठिकाणी टॉवर मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्या, ज्यांची उंची अगदी गगनाला भिडणारी असते. पण बटाट्याची चाळ अविस्मरणीय आहे. पु.ल. देशपांडे यांनी 'बटाट्याची चाळ' मधून एका चाळीतलं विशिष्ट प्रकारचे जीवन उभे केले आहे.

पु.ल देशपांडे यांच्या बटाट्याची चाळ या बद्दलचे चिंतन पुढीलप्रमाणे:-

बटाट्याची चाळ अजून उभीच आहे. ऊन खात, पाऊस पचवीत, समोरच्या नवीन - नवीन इमारतींना तोंड देत उभी आहे. खिडक्यांचे आणि कठड्यांचे लाकडी गज दे. अर्ध्याहून अधिक उडाले आहेत. जिने आपली पायरी सोडून वागायला लावले आहे असे भल्याभल्यांचे पाय येथे थरथरू लागले आहेत. भिंतीचे पोपडे उडाले आहेत. रंग तर कित्येक वर्षापूर्वी उडाला आहे. खूपच वर्ष झाली त्याला! आज जो रंग भिंतींना दिसतो ती छटा कुठल्याही डब्यातून येणाऱ्या रंगाची नाही.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

हा अनेक वर्षे अनेकांनी पुसलेल्या बोटांतून, टोकलेल्या डोक्यांतून, धुरातुन तयार झालेला रंग आहे.

घरातली कर्ती माणसे त्या वेळी हंगेरियन टोप्या घालायची नाही तर चौकड्यांचे रुमाल आंधायची. वकिलांना पगड्या द्यायची ऐपत होती. आणि डॉक्टर लोक 'फेल्ट हॅट' घालायचे. माणसे एकतर म्हातारपणामुळे मरायची किंवा प्लेग, देवी, कॉलरा यांसारख्या मातब्बर रोगांमुळे मान टाकायची. तात्पर्य तो काळ म्हणवुन घ्यायच्या लायकीचा होता.

देशभर पारतंत्र्याचे वारे खेळत होते. पुढारी संख्येने बेताचेच होते. करमणुकीच्या कार्यक्रमांना सांस्कृतिक कार्यक्रम म्हणत नसत. नाटक, नाच, नायकिणीचे गाणे असे ठसठशीत शब्दप्रयोग होते.

साहित्याचा बाजार भरलाच नव्हता. फुटकळ विक्रीची दुकाने होती अजून पुढे तयारी झाली नव्हती. कुठेतरी दोनचार पाले ठोकलेली होती त्यांत. समर्थांचे श्लोक छलबराऊ मोहनेला टेकून उभे असत आणि ठकसणे राजपुत्राच्या खांद्यावर मान टाकून शनिमहात्म्य विसावलेले दिसे. कथाकहाण्या सरळ होत्या. कुणाचे तरी भले व्हायचे काही तर निसंतान व्हायचे. वायफळ शब्दांचे बुणगे साहित्यात घुसले नव्हते.

undaram®
FOR EDUCATIONAL USE

जे काही येथे घडायचे ते दांडीवर टाकलेल्या रजापरी पंचा सारखेच स्वच्छ, बिनसुरकुतलेले आणि देशी ! कथानायक आणि नायिका सद्‌गुणी असायच्या.

हा बराटयाची चाळीच्या रंगदेखील काळाबरोबरच उडत गेला. रंगसंगती जन्माला आली नव्हती. रंगासकेतीला तो काळ तिच्या आपण्यात मुद्दाम म्हणुन दिलेले. दोनच रंग एक मुळचा चुना कासला होता तो, आणि पहिल्या महायुध्यात इंग्रजांचा जय झाला तेव्हा मालकांनी चाळीला पिवळे केले होते.

स्थूलमानाने आठवणी सांगायच्या म्हणजे पहिल्या कायदेभंगाच्या २-चळवळीत चाळीचे कवडे भंगायला सुरुवात झाली होती. बेचाळिसच्या चळवळीत लाकडी गज उडाले आणि खिडक्या उघड्या पडल्या.

बाकी एरवी बराटयाची चाळ आयुष्यभर ओकीबोकीच राहिली. उगीच दसरा दिवाळीला च्यारसव पणता, झेंडूची तोरणे आणि आंब्याचे टहाळे सोडले तर चाळीवर बाकी सौंदर्याचे संस्कार जवळजवळ नाहीतच. क्वचित कुणी गॅलरीत रांगोळीही घालीत असत, पण ती घालून होण्यापूर्वीच येणाऱ्याजाणाऱ्यांच्या पावलांनी गॅलरीभर व्हायची. नव्या नव्या चार दिवस अपापल्या परीने खोल्यांची दारे-खिडक्या रंगवायच्या पण

वर्षभरातच दुपटी वाळायच्या लागायची पुढल्या कठड्यावर आणि मग पाळण्यांवली मंडळी- जमिनीवर झोपायच्या वयाची झाली की गादयांही वाळत पडायच्या, कठड्यावर अंगाखांद्यावर शोभेची लेणी पडली नसली तरी चाळ राहिली, मात्र सदैव नांदतीगाजती लढाईच्या दिवसांत आसपासच्या चाळी ओस पडल्या, पण बटाट्याची चाळ तशीच होती. चाळीला वाऱ्या उजेडाचे वावडे! मधल्या चौकात चाळीची सारी घाण साचते जास्त आहेत, ढेकूण आहेत, पिसाळ्या आहेत. पण माणसे पतवंडांना मांडीवर खेळवून गेली. मलेरियात कुडकुडली. प्लेगात गाठी उठल्या. देवी आल्या. पण साठीच्या आतले काही कुणी कुणाच्या खांद्यावरून गेले नाहीत. चाळीच्या चिवटपणा दिसामासांनी चाळकऱ्यांतदेखील उतरल्या.

जन्म गेला सांचा इथे! आणि का कुनी करीत राहिले तर उरलेला जन्म इथेच जाईल, पण चाळीची लाज वाटते यांना! मैत्रिणीआ कधीकधी चहाला बोलावतात आणि ओनरशिपच्या ब्लॉक शोधण्याला गोष्टी बोलतात.

ndaram®

बटाट्याच्या चाळीतील पात्रे :-

कुशाभाऊ अक्षीकर :- यांना बटाट्याच्या चाळीत नाट्याभैरव अशी पदवी आहे. एके काळी ते गंधर्व कंपनीत (आचारी) होते. नाट्याचा हयांचा अभ्यास अत्यंत सखोल आहे. केशव नारायणांच्या 'संगीत मानापमानात' मुख्य चोराची भूमिका यांच्याकडे होती. परंतु नाटकाच्या तालमीत ते ह्या भूमिकेशी फारच तद्रूप व्हायला लागले आणि कंपनीतल्या लोकांनी यांची धास्ती घेतली. युद्ध धैर्यधराने ह्यांच्यामुळे हात टेकल्यावर प्रत्यक्ष प्रयोगात यांना आवरणे कठीण झाले. म्हणून ते कामच काय परंतु ती नोकरीही गेली आणि तेव्हापासून मुंबईच्या एका इंग्लीश फर्ममध्ये यांनी कारकुनांच्यासाठी लहानसे हॉटेल चालवले आहे. एखादया कारकुनाने काय कुशाभाऊ, 'गरम' काय आहे?" एवढा सवाल केला की "गरम भजी, गरम उसळ, चटकदार मटकी खुमासदार खमंग, टेसदार टोमॅटोऑमलेट, अशी नामावली ते उच्चारत असत. शिवाय कारकुनांना खायला घालण्याचे कार्य करीत असत.

एच मंगेशराव :- मंगेशराव हटंगडी हे चाळीचे मूर्तिमंत संगीत! युद्ध काळात व दंग्याच्या दिवसात चाळीचे (नैतिक धैर्य) टिकवण्याच्या बाबतीत ह्यांचा फार उपयोग झाला.

शास्त्रोक्त संगीताला, विशेषत: घराण्यांचा, त्यांचा अभ्यास फार दांडगा. तरुणांच्या दिवसात काहीही गर्दी झाली तरी मंगेशरावांच्या नुसत्या षड्जपंचमाने मंडपात चक्क पूर्णपणे सामसूम वातावरण होते.

शिवाय राजकारणाचा त्यांचा अभ्यासही चांगला आहे. संगीतातील जमाखर्च, ह्या विषयावर ह्यांचा विडवक्ताप्रचुर प्रबंधी आहे. एका ख्यातनाम गवयाच्या बैठकीत एकूण साडेपाच हजार मात्रांचा हिशोब झाल्याचे त्यांनी चटकन सांगितले.

सौ. वरदाबाई हंगडी :- ह्या श्री. एच मंगेशरावांच्या पत्नी! त्या मंगेशरावांच्या तालमीत तयार झाल्या. रेडिओवर त्यांचा पुढेमागे कार्यक्रम होणार होता. त्यांनी साहेब सुरावर्दी साहेब राजा-की-मेजवाले यांच्या जवळ संगीत शिक्षणाला सुरुवात केली. खाँसाहेबांनी ही शिकवणी सुरु झाल्यानंतर थोड्याच दिवसांत आपल्या पिढीजाद बुरखे शिवण्याचा धंदा सुरु केल्यामुळे त्यांचे संगीतशास्त्र थांबले. त्यानंतर काही दिवसात त्यांनी भरत-नाट्यम शिकवायला सुरु केले. परंतु त्यांचे नृत्य कलेतील गुरु जंबुराडा त्यांनीही नृत्यकला सोडून नोकरीत पायांनी पावाची कणिक तिंबण्याची नोकरी पत्करुन कला आणि जीवनाला संबंध जोडला. म्हणून ही त्यांना नृत्य कलेची खूप आवड आहे.

चाळीतल्या गणपतीत जाहीर कार्यक्रमात त्यांना नाचण्याची विनंती केली जाते. व ते ही नाचायला तयार होतात.

प्राध्यापक नागूनाना साठ्ये :- वास्तविक बटाट्याच्या काय परंतु जगातल्या कोणत्याही चाळीत नागूनानांच्या इतका विद्वान माणूस शोधून सापडणार नाही. पण चाळीतल्या कुठल्याही कार्यात मोडता घालण्याचे कार्य हे करीत असल्यामुळे एवढ्या विद्वान माणसाच्या सहकार्याला चाळ मुकली होती. परंतु सिंधमंडळ वगैरे कथा सुरू झाल्यावर नागूनानांनी धोरण बदलले होते. ज्ञानेश्वरीपासून ते रेल्वे टेशनपर्यंत सारे ग्रंथ नागूनानांनी पाठ करायला घेतले. त्यांना ती उपाधी आवडत नाही. जगातले सर्व प्रध्यापक गाढव आहेत. असे त्यांचे मत आहे. लोक त्यांना प्राध्यापक म्हणतात.

राघूनाना सोमण :- एका शब्दात वर्णन करायचे म्हणजे चाळीच्या ओसंडणारा उत्साह! चळवळीत राघूनानांचा उत्साह सदैव साडोबाँदरच्या लाटलीसाच्या फसफसून ओसंडत होता.


संकलन - संदेश

कवी मंगेश पाडगावकरांनी म्हटलं आहे ना? एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून! त्याप्रमाणेच एक विदूषक, एक गायक, एक लेखक हे फार लहानपणापासून माझ्या मनात दडून बसले आहेत. या तीनही प्रवृत्तींना वाव मिळावा अशाच घरात माझा जन्म झाला. हसवण्याच्या गुणा एवढंच भांडवल घेऊन ब्रम्हदेवाने माझी खानगी इहलोकी केली.

— पु. ल. देशपांडे

# पुलंची निवडक भाषणे

## — एक परामर्श



Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

* ३१ ऑक्टोबर १९७१ रोजी नाशिक येथील परशुराम सायखेडकर नाट्यमंदिराच्या उद्घाटन प्रसंगी पु.ल. देशपांडे यांनी केलेल्या भाषणाचा थोडक्यात आढावा.

प्रथमतः पु.ल. थोर देणगीदार परशुराम सायखेडकर यांचे आभार व्यक्त करतात व आपल्या भाषणाला सुरुवात करतात.

पु.ल. म्हणतात हे नाट्यमंदिर म्हणजे मला पुण्याच्या मध्यमवर्गीयांच्या घराप्रमाणेच वाटते, पैसा आहे त्यातुन दोन खोल्या बांधुन पुन्हा थोडेसे पैसे साठल्यानंतर ओसरी बांधायची व पुन्हा मुलाचे लग्न झाल्यानंतर खोली बांधायची अशा प्रकारे मध्यमवर्गीयांचे घर व त्याबाबतच्या समस्या या मारुतीच्या शेपटी प्रमाणे वाढतच असतात असे ते म्हणतात.

सायखेडकरांचे कौतुक करताना, पु.ल. असे ही म्हणतात, मघाशी मला नटराजाची पुजा करा असे सांगण्यात आले परंतु, नटराजाची पुजा करत असताना पुर्ण श्रद्धा ठेवून पु.ल. असे म्हणतात की, मला खरंच पुजा कराविशी वाटत होती ती म्हणजे सायखेडकरांची कारण नटराजाच्या मुर्तीत जे-जे काही मंगल, जे जे काही पवित्र, आंनददायी आहे ते मला आज सायखेडकरांमध्ये दिसत आहे.

अगदी गीतेत म्हंटल्याप्रमाणे अर्जुनाची षंढ अवस्था झाल्यानंतर जसे श्रीकृष्णाने आपले चारही हात उंचावून दर्शन दिले,

त्याचप्रमाणे आज त्या हातांचे दर्शन घेण्यासाठी मी आज या ठिकाणी आलो आहे. आज प्रत्येक ठिकाणी फक्त घेण्यासाठी हात पुढे होत असताना असा देण्यासाठी पुढे झालेला हात पाहण्याचे भाग्य हे मला लाभत आहे असे पु.ल. म्हणतात.

पुढे पु.ल. विनोबांनी केलेल्या संस्कृतिच्या व्याख्येचे उदाहरण देतात, ते म्हणतात भूक लागली असताना खाणे ही प्रकृती, भूक लागली नसताना खाणे ही विकृती ही विकृती आपणांपैकी बहुतेकांत असते - आणि आपल्याला भूक लागली असता दुसऱ्यालाही भूक लागली आहे हे जाणून आपल्या भाकरीतील अर्धी भाकरी त्याला देणे ही खरी संस्कृती. आपणांपैकी प्रत्येकाला अशी भूक लागली असता, आपल्या तोंडांतील संस्कृतीचा घास, हा सायखेडकरांनी काढून दिला हा त्यांचा विशेष आहे. भारतीय संस्कृतीचे तीन विशेष पुर्वी सांगितले आहेत. दान, तप व यज्ञ. त्यातील दानाला फार मोठा अर्थ आहे. दान करताना ते सत्पात्री करावे. अपात्री दान केल्यास पुण्य वैगरे सोडाच, पण आपल्या पापाच्याच पाट्या लागतात असे ते म्हणतात. नदीचे कार्य काय तर समुद्राच्या जीवनात आपले जीवन समर्पित करणे. त्यातच तिचे सार्थक असते. म्हणजेच त्या पाण्याची पुन्हा वाफ होते आणि त्याची पुन्हा नदी तयार होते! सत्पात्री दानाचे ही असेच आहे. त्यामुळे सायखेड-करांनी नाट्यमंदिर बांधले. ते मी मुक

Children's Theatre

बांधतो. अशी ईर्षा निर्माण होऊन.

सायखेडकरांबद्दल मला विशेष आदरभाव वाटतो तो या कारणासाठी की, त्यांचा व्यवसाय खुर्च्या वगैरे दुरुस्त करण्याचा त्यातुन त्यांनी या नाट्यमंदिरास देणगी दिली. पुढे पु.ल. नाट्यमंदिराच्या इमारतीबाबत बोलतात, नाट्यमंदिराची इमारत कशी आहे याला महत्व नाही. तो गौण मुद्दा असतो. नाट्यमंदिरात कसे प्रयोग होतात याला महत्व असते. कारण यामधुनच खरा कलेचा आनंद प्राप्त होत असतो.

रंगभूमी ही यज्ञभूमी असून सर्व कलांच्या तपस्व्यांना आपल्या कलांची आहुती येथे द्यावी लागते. रंगभूमीशी संबंधित प्रत्येक कलाकार हा महत्वाचा असतो. अगदी मेकमन मेकअपमन सुध्दा प्रमुख पात्राईतकाच तो महत्वाचा असतो असे पु.ल. असे म्हणतात.

पिंडदान व पित्राची श्राध्दे सर्वच करतात, परंतु अशा प्रकारे वडिलांचे केलेले श्राध्द हे सर्वात उत्तम असे वाटते असे पु.ल. म्हणतात. आज सायखेडकरांच्या वडिलांचा पुण्यात्मा जर या नाट्यगृहात फिरत असेल तर त्यांना आपल्या पुत्राने केलेले हे महान श्राध्द पाहून नक्कीच समाधान वाटेल।

आज या ठिकाणी आजच्या प्रसंगाला काहिसे गौण आणि अनुचित वाटत असले तरी पु.ल. प्रामाणिकपणे एक गोष्ट नमूद करतात. कार्यापेक्षा कार्यकर्त्याला व संस्थेपेक्षा संस्थापकांना महत्व दिले की, त्याचे संस्थान

व्हायला वेळ लागत नाही. दात्याने आपण या इमारतीची मुक वीट आलोत असे मानून नाटक किंवा कार्यक्रम चालू असताना विंगेतून हळूच डोकावून पाहून आनंद मानला पाहिजे.

अशा प्रकारे दात्याने कसे असावे हे, पु.ल. देशपांडे यांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातुन सांगितले आहे.

* 'नॅशनल बुक ट्रस्ट' ने आयोजित केलेल्या 'लेखक वाचक भेट' त्या कार्यक्रमात पु. ल. देशपांडे यांनी केलेल्या भाषणाचा थोडक्यात आढावा.

भाषणाची सुरुवात करताना पु.ल. देशपांडे असे म्हणतात त्या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी ज्या वेळी मला आमंत्रण देण्यात आले त्या वेळी ते स्वीकारावे कि स्वीकारू नये अशा विचारात मी पडलो कारण नॅशनल बुक ट्रस्टच्या अध्यक्षांनी लिहिले होते की, या समारंभांत भाग घेणाऱ्यांनी स्वतःविषयीचे एक निवेदन लिहून आणावे व ते वाचून दाखवावे. त्यामुळे पु.ल. अजुनच बुचकाळ्यात पडलो असे बोलतात कारण चार माणसांपुढे उभे राहून भाषण करण्याची सवय मला आहे पण आज गर्दीपुढे उभे राहुन भाषण किंवा आत्मचिंतन करण्याचा एक चमत्कारिक प्रसंग माझ्यावर ओढवला आहे व एका गाफिल क्षणी मी त्या आमंत्रणाचा स्वीकार केला आणि 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' असे मला वाटते. मला हे एक प्रकारचे प्राणसंकट वाटतं आहे कारण, नट आणि प्रेक्षक हा सामना समोरासमोर चालू असतो. बोलण्याचे काम जरी नट करत असला तरी समोरच्या प्रेक्षकांचे प्रतिसाद त्याला जाणवत असतात. पण लेखक आणि वाचक यांची भेट हि क्वचित होते. किंबहुना होतच नसते. समीक्षकासारखा व्यवसायिक नट वाचक सोडला तर पुस्तकातून आपण जे काहि म्हटले त्याला प्रतिसाद काय मिळाला

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

त्याचा अंदाज करणे अतिशय अवघड असते असे पु.ल. म्हणतात.

पुढे पु.ल. म्हणतात, नटाचे शरीर, त्याचा आवाज, त्याचे रंगमंचावरचे वावरणे हे जसे मुक माध्यम आहे. तसेच पुस्तक देखील मुका लेखकाचे माध्यम आहे. नटाला रंगमंदीरात भेटावे तर लेखकाला ग्रंथात भेटावे. वाचक आणि माझा संबंध माझ्या पुस्तकांमधूनच यावा असे पु.ल. यांना वाटते. 'काय म्यां पामरें बोलवीलें। उत्तरे परि त्या विश्वंभरे बोलवीलें।' असे तुकोबा म्हणाले. हे सर्वच लेखकांना लागू होते. पुष्कळ वेळेला काहि वाचक पत्र पाठवून आपल्या शंका विचारतात त्यातील मुक सारखा विचारला जाणारा प्रश्न म्हणजे आपण लेखनाची पूर्वतयारी कशी करता असा होय.

ध्नेश्वराने लग्नाच्या पूर्वतयारीत जसे मुक बोहले, वाजंत्री, मुक भटजी, नवरी आणि मुक नवरा मुलगा मुवढे बसू असे म्हटले आहे. तसेच मुक टेबल, मुक खुर्ची, कागद आणि शाई भरलेले मुक फाऊंटन पेन मुवढी ठक्क पूर्वतयारीपलिकडे लेखनाच्या पूर्वतयारीविषयी पु.ल. यांनी सांगितले नाही. आजही खोलीत कोंडून घेऊन लिहीत बसण्यापेक्षा व मित्रांच्या मेळाव्यात बोलत रहायला मला अधिक आवडते. त्यामुळेच माझ्या लेखन वाचनाच्या वेळा ही ठरलेल्या नाहीत. अगदी खरे सांगायचे तर मला लेखनाचा कंटाळा ही आहे असे पु.ल. म्हणतात.

FOR EDUCATIONAL USE

पु.ल. देशपांडे असेही म्हणतात की, वाचकाला 'शहाणे' करण्यासाठी मी कधीही लिहिले नाही त्यांच्या डोळ्यासमोरील वाचकाची मुर्ती ही त्यांच्या मित्रांसारखी आहे. 'माझीया जातीचा मज मिळो कोणी' मुवढीच भावना पु.ल. व्यक्त करतात. तुकाराम व रामदास यांच्या मराठीवर माझे अतोनात प्रेम आहे. असेही ते म्हणतात. लेखकांनी पुस्तकांतुन त्यांच्याशी बोलावे अशी धारणा पु.ल. व्यक्त करतात. पु.ल. त्यांच्या लिखाणाचा विचार करायला लागले की त्यांना वाटते, माझी सगळीच बैठक हि मुका कथेकरीबुवाची आहे. तिथे चिमूटभर संगीत आहे, थोडाफार वेदांत आहे आणि लोकांना सोपा न येतील अश्या बेताने सांगितलेल्या कथा हि आहेत.

गेली पंचवीस मुक वर्षे लेखन हा माझा धंदा चालला आहे. दुर्दैवाने या धंद्यात थोडे यश ही लाभले आहे. विनोदी लेखक असा शिक्काही बसला आहे. असे पु.ल. म्हणतात. स्वतःचा फारसा अपराध नसताना लेखकराव झाल्यामुळे लोकांना हसवण्याची सक्ती ही माझ्यावर आहे. मी स्वतःला Creative Artist न समजता Performing Artist समजतो. नाटकात समोर गर्दी दिसली की मला अवसान येते. मुका चमत्कारिक अवस्थेत सापडलेला लेखक म्हणून मी आपल्यापुढे उभा आहे. असे पु.ल. म्हणतात.

आपण आमचे वाचक आहात आपल्या भेटीचा हा योग घडवून आणल्याबद्दल 'नॅशनल बुक ट्रस्ट' चे आभार मानून पु.ल. आपल्या भाषणाचा शेवट करतात.

संकलन
रोहन स. भंडारे.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

* १४ डिसेंबर १९९३ साली 'गदिमा' हा पुरस्कार स्वीकारताना पु. ल. देशपांडे यांनी केलेल्या भाषणाचा थोडक्यात आढावा.

'गदिमा' हा पुरस्कार स्वीकारताना उत्तरादाखल काय बोलायचं हा प्रश्न पु. ल. यांना प्रथम पडतो कारण, त्यांना हा समारंभ इतका घरगुतीच्या वाटतो. पुढे पु. ल. म्हणतात "गदिमा पुरस्कार" हा मला आज काही पहिल्यांदा मिळतो आहे, असं नाही. ज्या दिवशी गदिमांनी त्यांच्या गाण्यांना चाली करण्याची परवानगी पु. ल. नां दिली त्याच दिवशी हा पुरस्कार त्यांना मिळाला असे त्यांना वाटते. आतापर्यंत तो पुरस्कार निराकार होता; आज तो साकार झालेला आहे, एवढाच काय तो फरक आहे असं त्यांना वाटते. पण हा पुरस्कार मिळाल्यानंतर एका मोठ्या विश्वासानं मी या कलेच्या क्षेत्रात वावरायला लागलो असे पु. ल. देशपांडे म्हणतात.

कवी हा नुसता हाताचा, लेखणीचा कवी नसतो. त्यांच्या रंध्रारंध्रात कविता असावी लागते. कोणत्याही कलावंताचं हे असचं असतं असे पु. ल. म्हणतात. गाताना तुम्ही बागेश्री गात असाल, किंवा भैरवी ती तुमच्या रंध्रारंध्रात असणे फार गरजेचे आहे. तिथं सुई टोचली अन् रक्त काढलं तरी ते रक्तसुद्धा बागेश्री गातचं बाहेर आलं पाहिजे. मग तिला गीत म्हणा किंवा काहीही म्हणा.

माडगुळकर एक भूमिका घ्यायचे, दुसरी भूमिका पु.ल. घ्यायचे. दोघांनी संवाद सुरू करायचे. ते प्रभाकर लिहून घ्यायचे आणि ते फायनल करायचे. सेटवर गेलं की, दुसरचं काही सुचायचं मग तो रेकॉर्डिस्ट म्हणायचा, "मग मला ही स्क्रिप्ट कशाला शोभेला देता?" पण ते माडगुळकर व मला आयत्या वेळी सुचायचं असं आमचं शुटिंग चालायचं. त्यावेळी पु.ल. मला कोणी तरी विचारलं "याचं तंत्र काय?" मी म्हटलं "ते मला हि माहित नाही. पण तुमच्या मनात कोठेतरी तो मंत्र असायला पाहिजे, तो मंत्र असेल तरच ते तुम्हाला येईल, नाहितर येणार नाही. शिकून येणाऱ्या त्या गोष्टी नाहीत. असे पु.ल. देशपांडे म्हणतात.

पुढे पु.ल. देशपांडे म्हणतात कॉलेजमध्ये सुध्दा कविता हा विषय म्हणून शिकवितात, त्याचं मला नवलं वाटतं. कविता हि तुम्हाला भावली पाहिजे. सुगंध शिकवायचा काय? उदबत्तीचा सुगंध शिकवा म्हटलं तर काय शिकवायचं? नाकात सर्दी भरलेली असेल तर शंभर उदबत्त्या लावल्या तरी काय उपयोग? त्याच्यासाठी हा प्रयत्न नसतोच मुळी. कविता करणं किंवा चाली करणं हे कधीही कष्टाचं नसतं. कष्ट होतात हिच खरी खोटी समजूत आहे. जर कष्ट वाटत असतील तर तुमच्या हातुन निर्मिती होणार नाही.

कधीतरी चैन पडेनासं झालं की, मी बालगंधर्वांची रेकॉर्ड किंवा सुधीरची गाणी ऐकतो. सुधीरची गाणी आणि माडगूळकरांची रचना. त्याच्या-इतका आनंद मला कोठेही दिसत नाही. असा हा मोठा माणूस. या माणसाच्या नावाने मला हा पुरस्कार मिळाला हे पु.ल. देशपांडे आपला सन्मान बहुमान झाला असे मानतात व शेवट माडगूळकरांचं स्थान मराठी अंतःकरणा-मध्ये कोठे आहे असं विचारलं तर मी सांगेन की जिथं अत्यंत पवित्र आणि सुंदर गोष्टी राहतात, त्या मनाच्या जागेमध्ये माडगूळकरांचं स्थान आहे. सुवर्ण बोलून पु.ल. आपल्या भाषणाचा शेवट करतात.

संकलन
रोहन स. भंडारे

* युसिसने आयोजित केलेल्या प्रकाशचित्रकला-प्रदर्शनाच उद्घाटन करताना पु.ल. देशपांडे यांनी केलेल्या भाषणाचा थोडक्यात आढावा.

प्रथम पु.ल. युसिसने भरवलेल्या प्रकाशचित्रकला प्रदर्शनाचं उद्घाटन करायचे आमंत्रण दिल्याबद्दल आभार मानतात व भाषणाला सुरूवात करतात.

प्रकाशचित्रकला आणि मी याचं नातं, 'यां चिंतयामी सततं मयि सा विरक्ता' असंच राहिलं आहे असे पु.ल. म्हणतात. पुढे पु.ल. म्हणतात मी माणसांचा फोटो काढला काय, किंवा जनावरांचा काढला काय शेवटी सगळे फोटो ढग आणि धुक्याचे येतात त्यामुळे त्या क्षेत्रात आपली भूमिका ही फोटो काढणाऱ्याची नसून पाहणाऱ्याची आहे हे मी पक्क ओळखलं आहे असे ते म्हणतात. काही लोकांचे चेहरे म्हणे फोटोजेनिक नसतात तशी माझी बोटे कॅमेराजेनिक नसावीत असेही पु.ल. म्हणतात.

फोटोग्राफर काय किंवा कवी काय, कथाकार, नाटककार हे सर्वप्रथम मुक उत्तम 'बघ्या' असावे लागतात. एखादं प्रतिबिंब असं असतं की, ते मनात रेंगाळतं कारण त्याला चिंतनाची जोड मिळते. मनातलं प्रतिबिंब आणि चिंतन त्यांच्या संयोगातूनच कलेचा जन्म होतो. त्या प्रदर्शनातलं प्रत्येक चित्रं ही मुक चित्ररूप कविताच आहे असं ही पु.ल. म्हणतात. या प्रदर्शनातली चित्रंही आता वास्तवातली असूनही कलेच्या स्पर्शाने ती अमर झाली आहेत.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

त्याच प्रदर्शनात मुका लहान मुलाचं लाडकं कुत्रं मरून पडल्यामुळे तो दुःखाने व्याकूळ झाल्याचं चित्र आहे. त्याच्या पाठिवर कोणाचा तरी सांत्वनाचा हात आहे. हात असलेल्या व्यक्तीचा फक्त हातचं दिसत आहे. त्या पोराच्या आयुष्यातल्या मृत्युच्या घडलेल्या वियोगाच्या वेदनेचा हा पहिला अनुभव इतक्या तीव्रतेने त्याच्या चेहऱ्यावर उमटले आहे की, त्या दुःख्याने आपण हेलावून जातो. त्या अजाण पोराचं दुःख हे आपलं दुःख होऊन जातं. आणि हा सहानभूतीचा झरा आपल्या अंतःकरणात वाहतो आहे या अनुभवामुळे आपल्याही मनाच्या निर्मळपणाची आपल्याला खात्री पटते. पु.ल. म्हणतात; मला तर वाटतं की माणसा माणसातल्या स्नेहाचं, सहकार्याचं, सहानभूतीचं क्षेत्र अधिका-अधिक व्यापक करीत नेणं हे कलेचं सर्वात मोठं कार्य आहे.

हे प्रदर्शन पाहताना त्याचं बाह्यरूप अमेरिकन असलं तरी 'जिकडे जावे तिकडे माझी भांवडे आहेत। याची सर्वत्र खूणा मला घरच्या मला दिसताहेत' असंच आपल्याला वाटेल याची मला खात्री आहे. चागलं प्रकाशचित्र निघणं हा अपघात मानला जातो. तो अपघात नसून, व्ह्यू फाईंडरमधून दिसणारं दृश्य आणि ते दृश्य पाहणारं फोटोग्राफर च मनं ह्यांच्या मुकरूपतेच ते क्षणाचं टिपण असतं. मुखाद्या दृश्यातला अरूप आशय आपल्या साऱ्या व्यक्तिमत्वात सामावून गेल्याशिवाय त्याला जसं कविता किंवा कथारूप देता येत नाही तसचं फोटो काढतानाही

undaram®
FOR EDUCATIONAL USE

त्या दृश्याचं सत्व मनात रुजल्याखेरीज चांगलं चित्रं निघूच शकत नाही.

ह्या मानवी संसारात अशी असंख्य चित्रं दडली आहेत. सामान्यांच्या डोळ्यांतुन निसटलेली भावगर्भ दृश्यं दाखवणं हे फोटोग्राफरचं काम आहे. कलेच्या बाबतीत तंत्रमुग्ध होण्यापेक्षा मंत्रमुग्ध होण्याला मी जास्त महत्त्व देतो असे पु.ल. देशपांडे म्हणतात. त्या चित्रांनी मला मंत्रमुग्ध केलं तशी ती आपल्यालाही करतील याची खात्री आहे. हे प्रदर्शन पुण्यात आणल्याबद्दल पु.ल. युसिसचे आभार मानतात व भाषणाचा शेवट करतात.

संकलन
रोहन स. भंडारे



# एक द्वंद्व

अभ्यास : एक द्वंद्व या भाषणात पु. ल. देशपांडे म्हणतात.

ज्योतिबा फुले, टिळक, आगरकर हरी नारायण आपटे, गडकरी, केशवसुत, बाल कवी असे संत विचारवंत कांदबरीकार नाटककार, कवी तुमच्याशी बोलत असतात. वास्तविक ही माणस आज आपल्यात नावीत तरी त्यांच बोलणं मृत्युसुद्धा थांबवू शकला नाही. तुम्ही एखाद्या थोर लेखकाच्या धडा म्हणून जेव्हा वाचता तेव्हा तुमच्या लक्षात केव्हा येईल ठाऊक आहे? तुम्ही ज्या वेळी पुस्तक हे थोरांना भेटण्याची संधी आहे या दृष्टीनं ते हाती घ्याल तेव्हा.

परीक्षेला पुस्तक नेमलंय म्हणून वाचलं पाहिजे अशा भावनेनं जर तुम्ही पुस्तक हातात धरलंत तर त्या लेखकाशी तुमच्या संवादच सुरु होणार नाही. कांदबरी असो किंवा अगदी रुक्ष वाटणांर भूगोलाचं पुस्तक असो, कुणी तरी आपल्याशी केलेली ही कानगोष्ट आहे, कुणी आपल्याला खुप आवडलेली माहिती खुप हौसेनं देतो आहे. अशा भावनेनं जर आपण ते हाती धरलं नाही तर तुमचा संवादच सुरु होणार नाही.

एखादी कविता तुम्ही वाचत असताना एकदम म्हणता की नाही "वा! वा! काय छान आहे ही ओळ! एखादी विनोदी कथा वाचताना खुदकन हसता की नाही? अशा वेळी आई वरवर पाहणाऱ्याला एकटेच आहेत असं वाटत असतं पण आपण एकटे असतो काय? आपल्याशी चि. वि. जोशींचे चिमणराव बोलत असतात गडकऱ्यांचे बाळकराम ठकीच्या लग्नाची कथा सांगत असतात. आईला बिचारीला कसं कळणार, की तुम्ही या वेळी थोर विनोदी लेखकाशी कानगोष्टी चालवल्या आहेत ते?

गणिताच्या काय, भूगोलाच्या काय किंवा भाषाविषयाच्या काय। कुठल्याही पुस्तकाच्या सहवासात तुम्ही असताना एखादा मित्राच्या सहवासात, आणि ते देखील आपल्यापेक्षा ज्यानं खूप निरनिराळं गोष्टीचा अनुभव घेतलाय अशा मित्रांच्या सहवासात, आता दोन चार तास काढणार आहोत असं समजावं म्हणजे जे पुस्तक उगीचच तुम्हांला परीक्षेची भीती घालत आहे असे वाटत. ते तुमच्या मित्रासारखं तुम्हाला वाटेलं.

पु.ल देशपांडे यांनी बडोदे येथील शारदोपासक मंडळाच्या वार्षिक अधिवेशनात केलेले अध्यक्षीय भाषण.

आपणासारख्यांपुढे अध्यक्ष म्हणून बसताना वर्गातल्या टारगट विद्यार्थ्याला मास्तरांनी मॉनिटर केले म्हणजे तो जसा केविलवाणा दिसायला लागतो तसा माझा मी दिसू लागलो आहे असे पु.ल म्हणतात.
नाट्यविषयक आणि काव्यविषयक टीकाग्रंथ वाचून ती तयारी करण्यात वेळ घालवण्याऐवजी मी नाटके पाहणे किंवा कविता वाचणे अधिक पसंत करतो असे पु.ल आपल्या भाषणामध्ये म्हणतात.

पु.ल. पुढे म्हणतात की आपले आमंत्रण स्वीकारले ह्याचे एकच कारण म्हणजे 'बडोदे' हे मला साहित्य-संगीत-कलांचे एक पुण्यक्षेत्र वाटते. आणि दुसरी गोष्ट माझ्या लेखनाची सुरुवात मी बडोद्याच्या 'अभिरुची' तून केली. बडोद्याला येण्यामागे एक जिव्हाळा आहे आणि ह्या दोन, तीन दिवसात आपणासारख्या रसिकांची सतत भेट होईल असे पु.ल. देशपांडे आपल्या भाषणामध्ये म्हणतात.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

पु.ल. पुढे म्हणतात की म्हणूनच मला वाटते की साहित्याचा विचार करताना देशोदेशीच्या कलावंतांच्या शोधांकडे निर्मितीकडे अत्यंत आस्थेने आणि खुल्या दिलाने पाहायला हवे. केवळ आपल्या मराठी साहित्याचा विचार तरी मराठी समाजाचे जे अनेक थर आहेत. त्या त्या थरातून साहित्य कसे फुलते आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. आज विज्ञानाने तर कितीतरी नवी दालनं उघडली आहेत, चित्रपट, रेडिओ, टेलिव्हिजन ह्या नव्या शोधांच्या अनुषंगाने साहित्याचे असंख्य प्रकार पुढे येऊ लागले आहेत असे पु.ल. म्हणतात.

पु.ल. देशपांडे यांना ललित साहित्याचे वाचन हे मूक संवादासारखे वाटत आले आहे. पु.ल. म्हणतात की शेकसपिअरशी बोललो आहे, टॉलस्टॉय, डोस्टोवस्की, टागोर, हरिभाऊ, शरदबाबू, तांबे अनिल बोरकर, कुसुमाग्रज अशा अनेक लहान थोर कलाकारांशी मनोमन बोललो आहे. म्हणून कसल्या तरी आनंदाची माझ्या मनात साठवण झाली आहे. असे पु.ल. देशपांडे म्हणतात.

पु.ल. असे म्हणतात की मी आपणाला सुरुवातीलाच सांगितले की, विद्वत्ताप्रचुर विद्धांत सांगणाऱ्या पंडिताची माझी भूमिका नाही. जीवनात जिथे-जिथे मला विसंगती आढळते ती पाहून मी माझे विनोदी लिखाण केले आहे.

पु.ल देशपांडे आपल्या भाषणामध्ये हा मुद्दा मांडतात की निर्मलतेचे दर्शन घडवणारा लेखक जगातल्या कोठल्याही भाषेतून आला तरी तो मला माझाच वाटतो मात्र तो मराठीतून आला तर पु.ल देशपांडे यांना अधिक आपला वाटतो.

संकलन - सनी चिंचे

ndaram®
FOR EDUCATIONAL USE

पु. ल देशपांडे यांनी केलेले भाषण कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्याबद्दल विलेपार्ले येथे झालेल्या सत्कार समारंभात केलेले भाषण.

कवी अनिल यांच्या ओळी पु.ल. देशपांडे यांनी या भाषणात खालीलप्रमाणे दिल्या.
प्रीत तुझी माझी । प्रीत तुझी माझी नाही
निराळेपणाची जगातल्या सुखदुःखी
मिळालेपणाची.

पुढे पु. ल. देशपांडे म्हणतात की ह्या ओळी सुरु झाल्या किंवा देशिल ना पण तुझ्या कुशीच्या वेड्यांना आधार यासारखी ओळ कानांवर पडली की हजारो डोळ्यांतून अश्रू वाहायला लागायचे कुसुमाग्रजांची ही कविता 1939 साली प्रथम भेटली. त्यावेळी मी वीस वर्षांचा कॉलेज - विद्यार्थी होतो. या पिढीने या काळीही एकमुखाने कुसुमाग्रजांना आपल्या पिढीचा कवी मानलं आणि असंत अभिमानाची गोष्ट अशी की ही आपुलकी पिढ्या बदलल्या तरी कुसुमाग्रजांना आजवर सतत लाभत आलेली आहे.
'विशाखा' पासून सुरु झालेला हा प्रवास यांच्याच कोलंबसाच्या गर्वगीतातल्या ओळी खऱ्या करणारा झाला आहे. असे पु. ल यांनी म्हटले आहे.

कुसुमाग्रजांच्या साहित्यातल्या नित्यनूतनाबद्दल असंच म्हणता येईल पन्नास वर्षांपूर्वीच्या 'विशाखा' असो की 'मुक्तायन' असो

कोणतीही कविता कशी. सध्या फुललेल्या चैत्रपालवीसारखी जिवंत 'रसरशीत चैतन्याने फुललेली आहे.

कुसुमाग्रजांच्या नाट्यनिर्मितीविषयी बोलताना यांची 'नट' नावाची एक अतिशय सुंदर कविता यांनी दिली आहे. नाटकाचा प्रयोग संपला आहे, नाटक संपल्याची नटाच्या मनाला खंत आहे असे पु.ल देशपांडे भाषणामध्ये म्हणतात.

नाटक नव्हे
तीन तासांचं एक अंकुरुप
अस्तित्व संपलं आहे.
माझ्या अस्तित्वाच्या कणिका घेऊन हजार
प्रेक्षक घरी गेले आहेत.
मी एक होतो तो अंशाअंशाने हजारांच्या
जीवनात कदाचित स्मरणातही
वाटला गेलो असेन.

पु.ल देशपांडे आपल्या भाषणामधून पुढे म्हणतात, मित्र हो. ह्याच पाल्यात माझ्या वयाच्या विसाव्या वर्षी कुसुमाग्रजांच्या कवितेनं मला पहिल्यांदा झपाटलं आज सत्तरीच्या घरात शिरलो तरी कुसुमाग्रजांनी कविता हाती आली की पुन्हा एकदा त्या विशीतल्या झपाटलेपणाचा अनुभव मला येतो.

संकलन - सनी शिंदे.

अंदमान येथे 1 जुलै 1970 रोजी 'स्वप्न आणि सत्य पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात पु.ल. देशपांडे यांनी केलेले भाषण.

पु.ल देशपांडे काही दिवसापूर्वी श्री हरिभाऊ लिमये आले आणि मला म्हणाले की 'साने गुरुजींच्या पुस्तकाचं प्रकाशन आहे. या समारंभला तुम्ही भाषण करायच्या यावं अशी माझी इच्छा आहे. गुरुजी विषय मला आस्था आहे यांचे स्मरण असलेली मंडळी अजून आहेत हे पाहून मला बरे वाटले. मी काय किंवा स्वतः हरिभाऊ काय.

आपण आताच सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पघट अर्पण केला. या खोलीचा उल्लेख अंदमानातली कोठडी असा केला जातो. परंतू ज्या वेळेला एखादया कोठडीमध्ये प्रत्यक्ष तेजच जिथे गेलो होतो तो असाच एक गाभारा झालेला आहे. पु.ल. देशपांडे असे म्हणतात की तिथे एक मुर्तिमंत तेज वावरत होत. तेजास्विनाऽवधीतमस्तू असं आपण पुष्कळ वेळेला नुसतं म्हणतो आणि महत्वाच विसरून जात असते असे पु.ल. म्हणतात.

पु.ल देशपांडे असे पुन्हा पुन्हा रोज म्हणत की ज्यांची काया, वाचा, मन अवघ व्यक्तिमत्व अंतर्बाह्य तेजस्वी होत अशी अलीकडच्या काळातली भारतीय इतिहासातली

व्यक्ती शोधायला गेलो तर वीर सावरकरांची मूर्ती डोळ्यांपुढे आल्याशिवाय राहत नाही असे पु.ल. म्हणतात.

पु.ल असे म्हणतात अंधाराचे ते सगळ्यात मोठे शत्रू होते मग तो अंधार अंधश्रध्देने आलेला असो अंधविश्वासाने आलेला असो किंवा पारतंत्र्याचा असो त्या अंधाराविरुद्ध त्यांची झुंज होती. पु.ल. यांच्या विचार मनुष्य आणि निसर्ग, मनुष्य आणि समाज आणि मनुष्य नि तो स्वतः ह्या तिन्ही शक्तींशी त्यांची रस्सीखेच चाललेली असते. सावरकर असे म्हणतात की युध्दाचा पहिला नियम असा आहे की मी जिंकणारच अशा भावनेनेच युध्दात उतरावं लागतं, सावरकरांनी सुद्धा 'मारिता मारिता मरावे' ह्याचा उद्घोष केला होता. पराजित मनाने लढणारा माणूस कधीही युद्ध जिंकू शकत नाही असे पु.ल देशपांडे म्हणतात.

सावरकर यांच्या वयाच्या सातव्या-आठव्या वर्षापासून त्यांच्या जीवनातली प्रत्येक घडी ही आत्मार्पणाचीच होती जिथे जिथे म्हणून मोकळा श्वास घेता येत नाही तिथे उडी मारुन तो श्वास मोकळेपणाने घेता येण्याची परिस्थिती निर्माण करण्यासाठी स्वतःचे प्राण पणाला लावेल त्याच वेळी ते जगणं खऱ्या अर्थाने पारमार्थिक होईल असे पु.ल. देशपांडे म्हणतात. की पारमार्थिक याचा अर्थ गळ्यात माळा आणि कपाळी टिळा लावून जयजय राम कृष्ण हरी

करीत राहणे असा करतो. पण जोवर माणूस आणि निसर्ग आणि समाज, माणूस आणि तो स्वतः ह्या द्वंद्वांना सामोरे जाऊन तो कोडी उलगडण्यामागे लागत नाही तोवर ते जगणं केवळ आहार, निद्रा भय मैथून ह्या चौकोनातच पशुप्रमाणे सीमित राहील. ते पारमार्थिक होणार नाही. आणि एकदा का ह्या जीवनाचं यथार्थत्व पटलं की मग चित्त भयशून्य होते. प्रथम ते मुक्त होते. मरणाच्या महाभयातून सावरकरांना मृत्युंजय म्हणायचे ते ह्या अर्थानेच!

वीर सावरकर आणि काळाचं किती विराट स्वरुप दोन ओळीत त्यांनी उभं केलं आहे पहा.

शतजन्म शोधिताना शत आर्ति व्यर्थ झाले.
शत सूर्यमालिकांच्या दीपावली विझवल्या.

सावरकरांसारख्या महापुरुषाला ज्या अंदमानमध्ये बंदिवास झाला ते अंदमान आज तीर्थक्षेत्र झाले आहे असे म्हणतात.

# पु.ल. भावांजली



# पुलंना पत्र...

पु. ल. देशपांडे,

तुम्ही राज्य स्थापले नाही. चळवळी केल्या नाहीत. घोषणा दिल्या नाहीत. पण, तुम्ही हजारो हृदयावर अधिराज्य गाजवले. तुम्ही इथल्या गंभीर माणसांना हसायला शिकवले. त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यांना जीवनाचा मनमुराद स्वाद चाखायला शिकवले. त्याहीपेक्षा अधिक तुमचे लेखन वाचताना माणसाला आपल्या रक्ताचा लालरंग वाढल्यासारखा वाटतो. चारदोन रक्तपेशी नव्याने निर्माण झाल्या आहेत असे वाटते. माणसांशी स्वतःला जोडण्याच्या वाटा दिसू लागतात. आयुष्याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी तुम्ही घडवलीत. मोठ्या घटनांचे आणि मोठ्या माणसांचे मोठेपण उमेदपणाने उलगडून सांगितलेत.

तुमच्याजवळ वेगळी आणि अपूर्वाईची गोष्ट होती, ती हृदयाची मुक्तता आणि उदारता - दोन्ही हात पसरून तुम्ही सगळ्या भल्या आणि निर्माणअप गोष्टींचे स्वागत केलेत. अहंकाराचा वारा न लागू देता तुमची दाद भरभरून आणि खुलेपणाने उमटत राहिली.

तुम्हाला काळाच्या बदलत्या चेहऱ्यामागच्या शाश्वत-मूल्यांचे अचूक भान होते. त्या मूल्यांची पूजा तुम्ही लेखनात तर बांधलीच पण व्यक्तिगत जीवनातही बांधत आलात. शिवाय लेखन म्हणजे संवाद आहे हे तुम्ही चांगले ओळखले होते म्हणून माणसांपासून तुमची नाळ कधी तुटली नाही.

आपण शहाणे असल्याचा दर्प तुमच्या वागण्याला आला नाही की तुमचा एखादा मठ - गटही तयार झाला नाही.

FOR EDUCATIONAL USE

तुम्ही माणसांशी फार उत्कटपणे बोलत राहिलात. शब्दांच्या शक्तीवर मोठा विश्वास टाकलात म्हणून माणसेही तसा टाकत गेली. भाषा हाच मुळी तुमच्या प्रेमाचा विषय होता. तुम्ही तिला मनःपूर्वक खेळवले. मराठी बोलण्याच्या किती तऱ्हा तुम्ही दाखवल्यात! भाषा ही एक जिवंत गोष्ट आहे हे सामान्य माणसाला तुमच्यामुळे सर्वाधिक जाणवले.

तुम्ही कवितांची विडंबने जितक्या बहारीने केलीत तितक्याच कौशल्याने माणसांचे मर्मबंध उलगडलेत.

— अरुणा ढेरे

FOR EDUCATIONAL USE

मी मोठा तू लहान मी शुध्द तू अशुद्ध मी बलवान तू दिनवाणा मी विद्वज्जड तू सर्वसमावेशक सर्वसमावेशक याच्याच दुसरा अर्थ म्हणजे लोकाभिमुख शब्द नुसते शब्द बापरे शब्द बापरे शब्द नाही अहाहा शब्द.

शब्द ही एक शक्ती आहे शब्द म्हणजे निखारा छे छे शब्द म्हणजे फुलोरा मैलोनमैल पसरलेल्या फुलांच्या तारुण्याच मनोहारी दर्शन सुगंध तर असा की कितेक पिढ्या उलटून जाव्यात तरी त्याचा दरवळ तितकाच ताजा राहावा. कशावर तरी प्रेम जडावं... प्रेम जडावं शब्दातून निर्माण होणाऱ्या अनामिक शक्तीवर त्या शक्तीची उपासना व्हावी आणि उपासने पोटी त्या शक्तीवरच भक्ती जडावी. शब्द म्हणजे निखारा म्हणणाऱ्याने त्या शब्दांच्या निखाऱ्यांची सुंदर फुलं होताना पाहावी विखुरलेल्या फुलांमधून शब्दांच्या अनोखा वसंत फुलतो सर्वसामान्य सुसंस्कृत मराठी मनाला भिडणारे शब्द मराठी घराघरातून साध्या-सरळ शब्दांची माळ गुंफली जाते साध्या शब्दांमध्ये दडलेला भावार्थ विलक्षण गहिरा असतो शब्द शब्द मनाची पकड घेतात अर्थाच्या कॅलिडोस्कोप मधून वेगळं अनोख विश्व उभं राहतो सर्वसामान्याच्या आसपासचा विश्व मध्यमवर्गाच्या च्यौकटीतलं विश्व आणि मग यात विश्वातील सामान्य व्यक्ती कधीतरी नकळतपणे दत्त म्हणून समोर उभी ठाकते कुठेतरी वस्त्यांच कुठेतरी यापूर्वी याला पाहिलय कुठेतरी भेटून याने कडकडून मिठी मारली तो शब्दातून भेटलाय तो रंगभूमीवर भोवतीच्या अंधारात धडपडताना दिसलाय तो कुठेतरी बसून पेटीचे सुर काढतोय कोणत्यातरी टूरिंग टॉकीज

मध्ये तो मुंडासे आणि फेटे वाल्यांना भरपूर हसवतो रसिकहो मित्रहो श्रोतेहो म्हणत त्याने कुर्त्याच्या बाह्या सावरत विराट जनसमुदायाच्या मनाचा कब्जा घेतला तोच कुठेतरी लग्न मंडपाच्या एका कोपऱ्यात उभा राहून नारायणाची त्रेधातिरपीट पाहतोय तोच काकाजी च्या मुखातून जीवनाचं तत्वज्ञान सोप्या लडिवाळ भाषेत उलगडते तोच प्रा अशोक जहागीरदार बनवून आचार्य आणि च्यायला च्या दोन शब्दांमधील ध्या च विश्लेषण करतोय तोच नांदेड नाट्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून व्यासपीठावरुन शब्दांची अनोखी फेर झाडतोय तोच इंद्रायणी काठी म्हणतोय तोच नाचरे मोरा आंब्यांच्या वनात म्हणून बाल वयाला खुणावतोय तोच राष्ट्र सेवादलाच्या कलापथकात साठी पुढारी पाहिजे नावाचा वग लिहितोय तोच तमाशा परिषदेच्या अध्यक्षस्थानी बोर्डावर उभा राहा ढोलकी तुणतुण्याच्या तालासुरात लावणी म्हणत पसंतीची शिळ मिळवतोय तोच आरती प्रभू आणि मर्ढेकरांच्या कविता वाजतो.

" अभ्रांच्या ये कुंद मकूमे पानांना ये हिरवी गुंगी वैशाखाच्या फांदीवरती आषाढाची गाजर पुंगी " तोच पंडित भीमसेन जोशींची साथ करतोय वसंतराव देशपांडे यांच्या मांडीला मांडी लावून बसलाय आणि त्याचीच तर गणेशोत्सवातील गाणी ऐकण्यासाठी धांदल उडालीय एका गिरगावात निरनिराळ्या वाड्यांमधून निरनिराळे गवई गात आहेत एक शनिवार रात्र आणि सात इतकी गाणी आंबेवाडीत मल्लिकार्जुन मन्सूर नाहीतर कागलकर बुवा

ब्राम्हण सभेत मास्टर कृष्णराव शास्त्री हॉलमध्ये राम भाऊ सवाई गंधर्व तारा टेम्पल लेनमध्ये गंगुबाई चुनाम लेनमध्ये हिराबाई बडोदेकर जिव कासावीस होऊन जायचं कुठे कुठे म्हणुन पळत सुटायचं तो एकटा किती जणांना आणि कशा कशाला पुरा पडणार तो सामान्य जीव मध्यमवर्गीयाच्या चौकटीतून शब्दांचे फुलोरे फुलवर होता तो तरी किती किती ठिकाणी पुरा पडणार यावर नियती खोखो हसत होतीस। व्यक्तीने स्वतःच्या जन्माचं मोठं सुरेख वर्णन केलं होतं

मुंबईतल्या गावदेवी भागातल्या कृपाल हेमराज चाळीतल्या पहिल्या मजल्यावर कडेच्या खोलीत 8 नोव्हेंबर 1919 ला शनिवारी दुपारी माझा जन्म झाला जगाच्या नाटकात पहिल्या प्रवेशात एंट्रीला गाण्याऐवजी भोकांड पुसरण असत मी एन्ट्रीला रडायलाच विसरलोय सुईणबाईपासून सगळेजण मला रड असं करत होते मी ढिम रडायला तयार नव्हतो शेवटी सुईणबाईंनी सुई तापवून माझ्या मनगटावर आणि कपाळावर जळजळीत चरका दिला आणि सुईणबाईंनी आपली उपाधी सार्थ केली मी तारसप्तकात किंचाळलो मी रडल्याची वार्ता चाळभर पसरली आणि मंडळी आनंदाने हसली माझ्या सत्यामीच्या रडणार सुद्धा हस झालं हा माझा पहिला एकपात्री विनोदी कार्यक्रम सर्वांत आधी नियती हसली सामान्य माणसाच्या आत दडलेल्या असामान्य प्रतिभा शक्तीचे दर्शन तिला झालं न पेलणाऱ्या पट्टी गाऊ नये बेटा नाहीतर सगळं

आयुष्य बिसूर होऊन जातं असं लिहिणाऱ्याच्या
असामान्याच्या आयुष्य बेसूर करणारी पट्टी
परमेश्वरालाही निर्माण करणे शक्य झालं नाही
तो सामान्य म्हणून जन्माला आला त्याने सामान्याची
जीवन कहाणी शब्दांच्या अशा काही उत्तुंग पातळीवर
नेऊन ठेवली की त्याची गणना सामान्यांमध्ये
होऊ लागली सुरुवातीपासून वक्तृत्वाची आवड होती
शाळा - कॉलेजातील वक्तृत्व प्राबीण्य पाहून
वडिलांना वाटलं चांगला वकील होईल पण नुसती
वक्तृत्वाची आवड असणारा माणूस बटाट्याची
चाळ डोळ्यासमोर उभी करू शकणार नाही त्यासाठी
माणूस उत्तुंग असावा लागतो कोण रे कोचरेकर
मास्तर आणि मंडळी कोण रे कोण कुशाभाऊ अक्षीकर
एच मंगेशराव आणि सोकाजी दादाजी भानाजी
त्रिलोकेकर कधीतरी कुठेतरी केव्हातरी ही माणसं
मराठी घरात शिरली आणि त्यानंतर ती घरातून
बाहेर पडलेच नाहीत मराठी माणसाने जाता-येता
रस्त्यात ऑफिसात हॉटेलात थिएटरात गच्चीवर
या माणसांची प्रतिबिंब पाहिली तेव्हा एक नव्हे दोन नव्हे
साडे तीन पिढ्या यांच्या दर्शनाने हरखून गेल्या
बाबा बर्वे म्हाळसकांत पोंबुर्पेकर मांडीला मांडी
लावून बसले शब्दांच्या आवाका इतका जबरदस्त
की हाडामासाची ती माणसं समोर आली आधी शब्दरूपाने
व त्यानंतर प्रत्यक्षात रंगमंचावर एकाच माणसाच्या
अफाट प्रतिभाशक्तीतून इंडियन नॅशनल थिएटरच्या
दापुभाई जव्हेरी यांच्या आग्रहामुळे नाट्यमहोत्सवात
बटाट्याची चाळ या नाटकाचा पहिला प्रयोग झाला
स्थळ भारतीय विद्याभवन चौपाटी दिनांक 17 फेब्रुवारी 1961

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

शुक्रवार रात्र साडेआठ वाजता पहिल्याच एंट्रीला कडाडून टाळी पडली पण पुढे हंशा आणि टाळ्यांचा सिलसिला थांबेनाच शब्दांचे कुलोरे क्या चीज है बाप्पा याने अख्खी बटाट्याची चाळ साभिनय उभी केली झुंडीच्या झुंडीने येणारा प्रेक्षक हसता हसता स्वतःला विसरून जात असे कुळा नामा बटाटे यांनी 1880 साली चाळ कशी बांधली तेव्हापासून ती निरनिराळ्या मालकांच्या हाती जात जात चाळीचे भाडे वसूल करणारा आद्य पुरभैय्या देवकीनंदन तिवारी यांच्या खापरपंतू जानकी दुलारे तिवारी यांच्या मालकीची कशी झाली येथपर्यंतच्या इतिहासातील गंमत शब्दफेक भावमुद्रा टायमिंगमध्ये सामावली होती संपूर्ण महाराष्ट्र लोटपोट होऊन गेला चाळीतील बाबा बरव्याची वासरी एव मंगेशराव आणि वरदाबाईच संगीत शिक्षण भ्रमण मंडळाची फरफट आणि गच्ची कुणाची आमची नाही कुणाच्या बापाची यावर हास्य कल्लोळाचे लोट उठत निरागस चेहरा अधिकच निरागस होत मिश्किल टायमिंगशी एक वाक्य येई.

लोकप्रभा साप्ताहिकात प्रकाशित

(2003)

संतूंचे हे बोलणे ऐकून रामनाथकाचार्य म्हणातो "आज पन्नास वर्षात तीन वेळचं स्नान चुकलं नाही की संध्या सोडली नाही." संतू पुन्हा बोलतो "करायची आहेत काय ती स्नानं ? नाही निर्मळता जीवना । काय करील हिंगण॥ ? संत तुकाराम संतूला थांबवतात. व म्हणतात "आम्हाला हा अपराध अमान्य आहे. आमचे बंड दंभाविरूद्ध आहे. मंबाजीबाबांसारख्या सच्छील ब्राम्हणा-विरूद्ध नाही." मंबाजी हा तुकारामाने अभंग ग्रंथ लिहिला व ब्राम्हणाचे जे वेद ग्रंथ लिहिण्याचे कार्य आहे. ते तुकारामाने केले. आणि मुळात तो शुद्र आहे. त्याचे कार्य तसेच संतू तेली गेनू चांभार यांनाही तुकारामाने ग्रंथ लिहिण्याचे वेड लावले आहे असे मंबाजी यांचे म्हणणे आहे. तसेच रामनाथकाचार्य ह्याने तर मोठाच आरोप केला. घोडा आणि शुद्र ही माणसांची वाहनं आहेत असं शास्त्र सांगतं. शुद्रांनी त्रैवर्णिकांचे रथ ओढले पाहिजेत. ते सोडून तू या शद्रांना तुझ्या-बरोबर ब्रम्हज्ञान शिकवायला लागलास ? त्यामुळे ब्राम्हणांनी काय करायचे ? असा प्रश्न सिद्धेश्वर विचारतात. त्यावर तुकाराम म्हणतात "त्यांचं सांगताना चुकत असेल तर त्याला सुधारायचं." अशाप्रकारे अनेक आरोप-प्रत्यारोप होतात. रामेश्वरशास्त्री हे न्यायदानाच्या कक्षेत बसून ह्या सर्व गोष्टी नमूद करून ठेवतात.

तुकाराम महाराज यांना हे आरोप अमान्य आहेत. तुकाराम म्हणतात, "दीनदुबळ्यांचा कळवळा, दंभाची चीड, जन्मजात थोरवीचा निषेध आणि पांडुरंगाविषयीचा दृढभाव हे जर माझे अपराध असतील तर मला आपण जरूर शासन करा." त्यावर रामेश्वर म्हणतात, "की तुम्हाला

तुमची बाजू मांडण्याचा अधिकार आहे." जानकी मध्येच येते व ती तुकाराम महाराज यांची बाजू मांडते परंतु त्यावर मंबाजी त्यांना विरोध करतो. त्यावर तुकाराम म्हणतात, 'आईच्या रूपाने विठाई बोलू लागली आहे. आता तुम्ही फक्त शिक्षा द्या."

रामेश्वरशास्त्री हे न्यायधीश आहेत. ते म्हणतात "न्यायाधीशाला शास्त्रनिर्बंधाच्या आधारानं न्याय द्यावा लागतो. शूद्रांना वेद वाचण्याचा - नव्हे श्रवण करण्याचाहि अधिकार शास्त्रानं दिला नाही, आणि वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा म्हणून शूद्रांना वेदाधिकार नसावा ह्या शास्त्रनिर्बंधाचं उल्लंघन केलं आहेस. तेव्हा तुझी अभंगरचना शास्त्रविरुद्ध आहे. तुसे अभंग या संताजी तेल्यानं ग्रंथबध्द केले. शूद्रानं ग्रंथरचना करणं हा तर महान अपराध तस्मात्, तात्काल हे अभंग नेऊन इंद्रायणीच्या डोहांत बुडविले पाहिजेत." तुकाराम महाराज रामेश्वरशास्त्रींनी देलेल्या आज्ञनेचे पालन करतात. मंबाजीच्या आनंद गगनात मावत नाही. तो संतूला चोपडी आणायला सांगतो. संतूला ह्या गोष्टीचा फार राग आलेला आहे. तो म्हणतो "तुम्ही ग्रंथबद्ध केलेली अभंगरचना पाण्यात बुडवत आहात. परंतु जे गेन्या चांभाराच्या तोंडात अभंग आहेत ते कुठे बुडवले जातील." तुकाराम म्हणतो, "संतू चल आता आपलं भांडण संपलं आता फक्त विठ्ठलाशी आपण भांडायचे." जिजाई येते व तुकारामांना म्हणते पंढरीच्या वारीवरून आलात आणि तुमची मी घरीच वाट पाहत आहे तीने अन्नाचा एकही दाना पोटात टाकलेला नाही ती तुकारामाला घरी जेवायला चला असं म्हणून निघून जाते. रामेश्वरशास्त्री मंबाजी व शास्त्रीबुवा यांना तेथून जाण्याचा आदेश देतात. रामेश्वर यांनी तुकाराम

यांना दिलेली आज्ञा ऐकून संतूला वह्या नेऊन गंगार्पण कर असे म्हणतात. संतू फार रडतो व त्याला ह्या गोष्टीचे वाईट वाटत आहे. तुकाराम जानकीच्या आशिर्वाद घेतात व निघून जातात.

जानकीला ह्या न्यायदानावर अनेक प्रश्न पडले आहेत. ती सरळ रामेश्वरशास्त्रींकडे जाते व त्यांना जाब विचारते. ते म्हणतात, "मी शास्त्रवचनांच्या आधारानं न्याय दिला आहे." परंतु हे जानकीला अमान्य आहे. यावर जानकी व संत तुकाराम यांच्यावरून रामेश्वर शास्त्रींसोबत वाद होतात. जानकी त्यांची समजूत काढायला जाते. परंतु रामेश्वरशास्त्री म्हणतात परंतु मी न्यायदानाच्या कक्षेत राहून मी हा निर्णय दिला आहे. तो आता पुन्हा घेता येणार नाही.

# संदर्भ


(१) व्यंगचित्रे - पु. ल. देशपांडे

(२) तुका म्हणे आता - पु. ल. देशपांडे

(३) बटाट्याची चाळ - पु. ल. देशपांडे

(४) श्रोतेहो - संपा. शांता शेळके

(५) रेडिओवरील श्रुतिका-भाषणे (संपादित)

(६) लोकप्रभा (2003)

(७) मराठी वाङ्मयकोश - संपादन (प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके इत्यादी)

(८) हसवणूक - पु. ल. देशपांडे